


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ८७ * नांदेड * गुरूवार, दि. २ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# राज्यात गॅस टंचाईचा धोका कायमचा मिटवण्यासाठी पीएनजी जोडण्यावर वेग

## इराण-अमेरिका युद्ध लांबल्याने सरकार झालं सावध

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्यात पीएनजी जोडण्या वेगवान होण्यासाठी राज्य सरकारकडून हालचालींना वेग देण्यात आला आहे. सिटी गॅस डिस्ट्रिब्युअशन पाईपलाइन टाकण्याकरीता विविध महानगरपालिका, नगरपरिषद सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग आणि अन्य प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या परवानग्या मंजूर समजाव्यात असा उल्लेख राज्य सरकारनं काढलेल्या परिपत्रकात करण्यात आला आहे, अशी माहिती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभुमीवर सरकारने हा निर्णय घेतला आहे.

नवीन सिटी गॅस डिस्ट्रिब्युअशन साठी मागण्यात आलेल्या परवानग्या २४ तासांत मंजूर करण्यात याव्यात. सिटी गॅस डिस्ट्रिब्युअशन विस्ताराकरिता खोदकाम करण्यात आलेले होते ते रस्ते पूर्ववत करण्यासाठी येणारे शुल्क माफ करावे, असं आदेशात म्हटलं आहे.

सिटी गॅस डिस्ट्रिब्युअशन संस्थांना २४ तास काम करण्याची परवानगी देण्यात यावी. सिटी गॅस डिस्ट्रिब्युअशन करताना पाईपलाईन टाकणे, खोदणे, पूर्ववत करण्यासंदर्भात मुख्य अग्निशमन अधिकारी वाहतूक पोलीस यांच्याकडून परवानगी घेण्याची गरज नाही, असं शासनानं जारी केलेल्या आदेशात म्हटलं आहे.

सिटी गॅस डिस्ट्रिब्युअशन जाळ्याच्या विकासासाठी विविध विभागामधे प्रशासकीय सहकार्य व समन्वय वाढवण्याकरता नियंत्रक, शिधावटप व संचालक नागरी पुरवठा यांना महाराष्ट्र राज्याकरिता नोडल अधिकारी घोषित करण्यात आले आहे. राज्य सरकारकडून जीआर काढत सदर आदेश ३० जून २०२६ पर्यंत अंमलात राहतील असा उल्लेख करण्यात आलं आहे.

ज्या भागातून सिटी गॅस डिस्ट्रिब्युअशन गेलेले आहे त्या भागातील हॉटेल व्यावसायिक आणि रहिवासी यांना केवळ रेशनिंग दुकानात अर्ज केल्यास ३ महिन्यात कनेक्शन उपलब्ध होणार

जागतिक घडामोडीमुळे एलपीजी (एलपीजी) पुरवठ्यावर मर्यादा आल्याने महाराष्ट्र सरकारने 'सिटी गॅस डिस्ट्रिब्युअशन' नेटवर्कचा विस्तार युद्धपातळीवर करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार, पाइपलाईनसाठीच्या प्रलंबित परवानग्या आता 'मंजूर' समजल्या जातील आणि नवीन अर्जांना २४ तासांत मंजुरी दिली जाईल. कामाला गती देण्यासाठी रस्ते पूर्ववत करण्याचे शुल्क माफ करण्यात आले असून कंपन्यांना २४ तास काम करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

# जालन्यात समृद्धी महामार्गावर भीषण अपघात, ८ जणांचा मृत्यू

**जालना (प्रतिनिधी)-** जालन्यात समृद्धी महामार्गावर बुधवारी झालेल्या भीषण अपघातामध्ये आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोन जण गंभीर जखमी आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, समृद्धी महामार्गावरील कडवंची गावाजवळ हा अपघात झाला. कडवंची गावाकडून जालना शहराकडे येणाऱ्या मजुरांच्या पिक अपला मागून येणाऱ्या भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत आठ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये सहा महिलांचा समावेश आहे. या महिला समृद्धी महामार्गावर सफाईचे काम करत होत्या. काम आटोपून या महिला पिकअप व्हॅनमध्ये बसल्या होत्या. त्यावेळी मुंबईच्या दिशेने निघालेल्या भरधाव ट्रकने पिकअप व्हॅनला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, आठ महिलांनी जागेवरच प्राण सोडला.

हा अपघात झाल्यानंतर मदतीसाठी पोलीस घटनास्थळी उशीरा पोहोचले, असा आरोप होत आहे. यामुळे स्थानिक नागरिक संतापले होते. या अपघाताचे नेमके कारण अद्याप कळू शकलेले नाही. दोन जण गंभीर जखमी असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. मात्र, यानिमित्ताने समृद्धी महामार्गावरील अपघातांचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या अपघातानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करुन मदतीची घोषणा केली आहे.

# महापालिकेचा १ हजार ३०७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प स्थायी समितीकडे सादर

## शहर ई-बस सेवा सुरु करण्याचा प्रस्ताव; जल-बेल मोबाईल ॲप सुरु होणार



**नांदेड (प्रतिनिधी)-** येथील महापालिकेचा सुधारीत २०२५-२६ चा तसेच २०२६-२७ चा १३०७.८० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी स्थायी समितीला बुधवार, दि. १ एप्रिल रोजी सकाळी एका विशेष बैठकीमध्ये सादर केला आहे. या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची करवाढ करण्यात आली नाही, त्यामुळे नांदेडकरांना दिलासा मिळणार आहे.

महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी स्थायी समितीच्या बैठकीत २०२६-२७ चा अर्थसंकल्प स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले यांना सुपूर्द केला. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम, निलेश सुंकेवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, गाढवे, सोनसळे, प्रकाश कांबळे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते. सदरील अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची करवाढ प्रस्तावित केली नाही. तसेच उत्पन्नाचे स्त्रोत व खर्चाची बचत यामुळे नागरिकांच्या सोई-सुविधेवर कोणताही परिणाम होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घेतली आहे.

बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे म्हणाले की, नांदेड शहरातील कौठा परिसरात भारतरत्न माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुर्णाकृती पुतळ्यासाठी कौठा परिसरात शासकीय जागा संपादीत करून पुतळा उभारण्यात येणार आहे. या पुतळ्यासाठी ३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शहरातील विसावा उद्यानाजवळ पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून राज्य सरकारने या कामासाठी दहा कोटींचा निधी मंजूर केला आहे. सदर स्मारक लवकर उभारणी करुन त्याचे लोकार्पण मे २०२६ पर्यंत करण्याचा प्रयत्न आहे. केंद्र सरकार पुरस्कृत पी.एम.ई -बस सेवा योजनेमध्ये महानगरपालिकेसाठी शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार व शहरातील लोकसंख्येच्या आधारावर शंभर बसेस अनुज्ञेय आहेत. त्या अनुषंगाने २५ मिनी बसेस व २५ मिडी बसेसची मागणी करणारा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून तसेच चार्जिंग स्टेशन, सब स्टेशन व बस डेपोसाठी पाच एकर जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला आहे. शहर प्रदुषणमुक्त होण्याच्या दृष्टीने नागरिकांकडून ई-वाहनांचा जास्तीत जास्त वापर व्हावा याकरीता महानगरपालिकेच्या स्वतः च्या जागेवर चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहे. माता गुजरीजी विसावा उद्यान नुतनीकरण करण्यासाठी यावर्षी ३ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली. शहरात हिरवळ वाढविण्याच्या दृष्टीने व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी यंदा १० हजार वृक्ष लागवड करण्यात येणार असून त्यासाठी ३५ लाख रुपये निधी खर्च करण्यात येणार आहे. शहरातील गोवर्धनघाट व सिडको येथील स्मशानभूमीचे बांधकाम जवळपास पूर्ण झाले असून सदर स्मशानभूमीमध्ये गॅसदाहीनी बसविण्यात येणार आहे. त्यादृष्टीने सदर कामाची निविदा मागविण्यात आली असून निविदा अंतिम टप्प्यात असल्याचे आयुक्त डॉ. डोईफोडे यांनी सांगितले. शहरातील नवीन रस्ते, नाली, ड्रेनेज व्यवस्था व इमारती यासाठी १७ कोटी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. नांदेड शहरात मध्यवर्ती ठिकाणी बहुमजली वाहनतळ उभारण्याचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आला आहे. शहरातील वाढती **(पान ३ वर...)**

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घटनेत बदल, तटकरे-पटेलांच्या स्पष्टीकरणावर सुनेत्रा पवार असमाधानी



**मुंबई (प्रतिनिधी)-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घटनेत बदल करण्यावरून पक्षात अंतर्गत संघर्ष तीव्र झाल्याचे चित्र दिसत आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी दिलेल्या स्पष्टीकरणावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार असमाधानी असल्याची माहिती समोर आली आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर १६ फेब्रुवारी रोजी तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि ब्रिजमोहन श्रीवास्तव यांच्या स्वाक्षऱ्यांचे एक पत्र निवडणूक आयोगाला पाठवण्यात आले होते. या पत्राद्वारे पक्षाच्या घटनेत बदल करून कार्याध्यक्षांना अधिक अधिकार देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आल्याचे सांगितले जाते. विशेषतः प्रफुल्ल पटेल यांच्याकडे अधिक अधिकार देण्याचा या पत्राचा उद्देश असल्याची चर्चा आहे. या घडामोडीनंतर सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून संबंधित पत्रव्यवहार अमान्य समजावा, अशी मागणी केली होती. यामुळे पक्षात संशयाचे वातावरण निर्माण झाले आणि दोन गट पडल्याची चर्चा रंगली आहे.

# अर्धापूर वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस सुरू; तालुक्यात वीज पुरवठा बंद

**अर्धापूर (प्रतिनिधी)-** तालुक्यात बुधवारी संध्याकाळी वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटासह पाऊस झाला. या पावसामुळे तालुक्यातील वीज पुरवठा बराचवेळ खंडित झाला होता.



दि. १ एप्रिल रोजी अर्धापूर तालुक्यात संध्याकाळी अवकाळी पावसाला सुरूवात झाली. या पावसाने तालुक्यातील रस्त्यावर पाणी साचले होते. तसेच या पावसामुळे शेतातील पिकांचेही मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांनी हळद शिजवून वाळू घातली होती. पावसामुळे ती झाकून ठेवता ठेवता शेतकऱ्याची तारांबळ उडाली आहे. वादळी वारे व अवकाळी पावसामुळे केळी, आंबा, पपई, टरबजू, खरबूज पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# नांदेड परिक्षेत्रातील गुटखा विरोधी मोहिमेत ७१ गुन्हे दाखल, ८१ जणांना अटक

## आतापर्यंत १ कोटी १९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड परिक्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या गुटखा विरोधी मोहिमेत ८१ आरोपींना अटक करण्यात आली असून ७१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत आतापर्यंत १ कोटी १९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १६ ते ३१ मार्च, २०२६ दरम्यान, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम उघडली होती. कॅन्सर सारख्या दुर्धर रोगांपासून, नागरिकांचा बचाव व्हावा, या दृष्टिकोनातून ही मोहीम राबविण्यात येत होती. सदर मोहिमेत दि. १६ मार्च ते ३१ मार्च, या १५ दिवसांच्या कालावधीत गुटखा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्या आरोपींविरुध्द कलम १२३, भारतीय न्याय संहिते अंतर्गत (७१) गुन्हे नोंदवून, अशा व्यवसायांत गुंतलेल्या (८१) आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे. सदर मोहिमेअंतर्गत, नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत खालीलप्रमाणे



कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण १ कोटी १९ लाख ९५ हजार ५३५ रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे.

या कारवाईत आतापर्यंत नांदेड जिल्ह्यात २८ गुन्हे दाखल केले असून ३१ जणांना अटक करण्यात आली आहे. यासह परभणीत १३ गुन्हे दाखल करून १८ जण ताब्यात, हिंगोलीत ११ गुन्हे दाखल करून ७ जण ताब्यात व लातूर १९ गुन्हे दाखल करून २५ जणांना अटक करण्यात आली आहे.

सदर मोहिमेत पोलीसांनी, परिक्षेत्रातील तीन हजारहुन अधिक दुकाने व पानटपऱ्यांची तपासणी करुन आपली मोहिम तीव्र केली होती. सदर मोहिमेदरम्यान, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, अपमित्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, गुटखा, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून, त्यास दहा वर्षापर्यंतच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

# राज्यात पुढील ३ ते ४ दिवस वादळी पावसाचा इशारा


**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्यात पुढील ३ ते ४ दिवस वादळी पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. मुंबई, उपनगरांमध्ये देखील आज हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मराठवाड्यात सर्वत्र विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. संध्याकाळ दरम्यान ४० ते ५० किमी प्रति ताशी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा इशाराही देण्यात आला आहे. अमरावती, चंद्रपूर, वर्धा आणि यवतमाळमध्ये गारपिटीची शक्यता आहे.

# विष्णुपुरी येथील ग्रामीण पॉलिटेक्निक कॉलेजच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)-** विष्णुपुरी येथील ग्रामीण पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये इलेक्ट्रॉनिक व्दितीय वर्षांत शिकणाऱ्या सानिका दत्तात्रय खंडारे या विद्यार्थिनीने वस्तीगृहाच्या खोलीत छताच्या हुकाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. ही घटना दि. १ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता घडली आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे आकस्मिक मृत्यू नोंद करण्यात आली.

या प्रकरणी फिर्यादी मयत मुलीचे वडील दत्तात्रय नामदेव खांडरे यांनी ग्रामीण पॉलिटेक्निक विष्णुपुरी येथे इलेक्ट्रॉनिक व्दितीय वर्षांत शिक्षण घेत असलेल्या कु.सानिका दत्तात्रय खंडारे रा.वाघी ता.हिमायतनगर हिने मुलीच्या वस्तीगृहाच्या खोलीत छताचा हुकाला गळफास लावून आत्महत्या केली. या प्रकरणी तात्काळ शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मरण पावल्याचे घोषित केले आहे. ग्रामीण पोलीस स्टेशन येथे आकस्मिक मृत्यूची नोंद ३२/२६ कलम **(पान ३ वर...)**




# दुचाकी चोरणारे अल्पवयीन चोरटे पोलिसांच्या जाळ्यात; १७ दुचाकी जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहराच्या विविध भागातून दुचाकींची चोरी करणारी अल्पवयीन चोरट्यांची टोळी वजिराबाद पोलिसांच्या गळाला लागली. चोरट्यांकडून पोलिसांनी तब्बल १७ दुचाकी जप्त केल्या आहेत. अजूनही या चोरट्यांकडून चोरीच्या दुचाकी जप्त करण्याची कारवाई सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी सांगितले.



दि. २१ मार्च रोजी फिर्यादी मोहम्मद जुनेद कुरेशी जमील कुरेशी या २४ वर्षीय मोबाईल व्यावसायिक यांनी तक्रार दिली. दि. १६ मार्च २३२६ रोजी रात्री १२.३० वाजेच्या सुमारास त्यांनी मोबाईलचे सामान खरेदी करण्यासाठी चिखलवाडी कॉर्नर येथील मारोती मोबाईल शॉप दुकानासमोर त्याची बजाज कंपनीची पल्सर २२० (एमचएच-२६ सीजे -२१२९) या क्रमांकाची गाडी लावून मोबाईलचे पार्ट खरेदी करुन १२.५० वाजता मोटार सायकल लावलेल्या ठिकाणी आले असता त्याची मोटार सायकल दिसून आली नाही. ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. यावरून वजिराबाद ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचा तपास पोलीस हवालदार विजयकुमार नंदे यांच्याकडे देण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस स्टेशन वजिराबाद येथील गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार हे पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दोन मुलांकडे चोरीची मोटार सायकल असून ते हिंगोली गेट, फटाका ग्राऊंड येथे थांबून आहेत. या माहितीवरून तात्काळ त्या ठिकाणी पोहचून पोलिसांनी सदर दोन मुलांना मोटारसायकल सह ताब्यात घेतले. ते दोन्ही मुले हे अल्पवयीन असल्याने त्यांचे पालकांस बोलावून पालकांसमक्ष दोन्ही बालकांना मोटार सायकल चोरी बाबत विचारपूस केली असता सदर मोटारसायकल ही चिखलवाडी कार्नर येथून चोरी केल्याचे मुलांनी सांगितले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता विविध ठाण्यात दाखल असलेले मोटारसायकल चोरीचे गुन्हे त्यांनी केल्याची कबूली दिली. त्यांच्याकडून १७ मोटारसाचकली जप्त करण्यात आल्या असून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे.

पोलीस ठाणे वजिराबाद येधील गुन्हे शोध पथकाने केलेल्या उत्कृष्ट कामगीरीबदल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांनी कौतुक केले.

# शेअर बाजारात तेजीचे पुनरागमन; सेन्सेक्स १,१८६.७७ अंकांनी वधारला

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** पश्चिम आशिया संकटावर लवकर तोडगा निघेल या आशेने देशांतर्गत शेअर बाजाराने आज जोरदार पुनरागमन केले. सलग दोन दिवस देशांतर्गत शेअर बाजाराला मोठे नुकसान झाले होते. दिवसाच्या पहिल्या सत्रात शेअर बाजारात जोरदार तेजी दिसून आली असली तरी, दुसऱ्या सत्रातील नफावसुलीच्या दबावामुळे ही वाढ मर्यादित राहिली. असे असूनही, व्यवहार बंद होताना, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) सेन्सेक्स १,१८६.७७ अंकांनी वधारून ७३,१३४.३४ वर बंद झाला. दरम्यान, नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसई) निफ्टी ३४८ अंकांनी वाढून २२,६७९.४० वर स्थिरावला.

आजच्या व्यवहारांची सुरुवात दोन टक्क्यांहून अधिक वाढीने झाली. बाजार उघडल्यानंतर, खरेदीच्या पाठिंब्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन्ही निर्देशांक आणखी मजबूत झाले. तथापि, सकाळी १० वाजल्यानंतर बाजारात तुरळक विक्री सुरू झाली, ज्यामुळे बाजाराच्या हालचालींमध्ये चढ-उतार झाले. दुपारी १ वाजल्यानंतर विक्रीचा दबाव वाढल्याने सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही त्यांच्या दिवसाच्या उच्चांकावरून एक टक्क्याहून अधिक घसरले. दिवसअखेरीस, सेन्सेक्स १.६५ टक्क्यांच्या आणि निफ्टी १.५६ टक्क्यांच्या वाढीसह बंद झाला.

दुसरीकडे, औषधनिर्माण क्षेत्रातील शेअर्सच्या विक्रीमुळे बीएसई हेल्थकेअर निर्देशांक ०.२३ टक्क्यांच्या घसरणीसह बंद झाला. व्यापक बाजारातही खरेदी सुरू राहिल्याने निफ्टी मिडकॅप निर्देशांकात २.२० टक्क्यांची वाढ झाली. त्याचप्रमाणे, स्मॉलकॅप निर्देशांक ३.४० टक्क्यांच्या वाढीसह दिवसअखेर बंद झाला.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील


# संशोधनाचे महत्त्व कसे नाकारणार?

आपल्या देशामध्ये पीएच.डी. पदवी ही दीर्घकाळापासून शैक्षणिक उत्कृष्टतेचे सर्वोच्च प्रतीक मानली जाते. संशोधन, विद्यापीठीय अध्यापन, धोरणनिर्मिती आणि वैज्ञानिक नवकल्पना या क्षेत्रांमध्ये प्रवेश मिळवून देणारा हा महत्त्वाचा टप्पा आहे. परंतु अलीकडील काळात भारतातील पीएच.डी. शिक्षण व्यवस्थेसमोर उभे ठाकलेले प्रश्न केवळ व्यवस्थात्मक नाहीत, तर देशाच्या संशोधनक्षमता आणि ज्ञानाधारित भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहेत. गेल्या दोन दशकांत आपल्या देशात उच्च शिक्षणाच्या विस्तारासाठी मोठी गुंतवणूक केली आहे. सुमारे १२०० विद्यापीठे, आयआयटी, आयआयएसईआर आणि विविध संशोधन संस्था उभ्या राहिल्या. मात्र, या विस्ताराच्या तुलनेत पीएच.डी. शिक्षणाला आवश्यक असलेला दर्जात्मक आधार मिळालेला नाही. अनेक संशोधकांना अपुरी फेलोशिप, विलंबित मानधन, अपुरी प्रयोगशाळा सुविधा आणि वाढत्या प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागतो. यासाठी अनेक योजना असल्या तरी त्या सर्व इच्छुक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. या पार्श्वभूमीवर सर्वात गंभीर समस्या म्हणजे निधीचा अभाव. संशोधनासाठी लागणाऱ्या अनुदानाची स्पर्धा वाढत चालली आहे, तर अनेक विद्यापीठे मर्यादित संसाधनांवर अवलंबून आहेत. विशेषतः राज्य विद्यापीठांमध्ये प्रयोगशाळा, डेटाबेस आणि क्षेत्रीय अभ्यासासाठी निधी अपुरा पडतो. परिणामी, समाजशास्त्र आणि मानविकी विषयांमध्ये संशोधन अनेकदा स्वखर्चाने करावे लागते, ज्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी मागे पडतात. याहूनही चिंताजनक बाब म्हणजे पीएच.डी. नंतरचे अनिश्चित करिअर. पूर्वीप्रमाणे पीएच.डी. केल्यावर स्थिर नोकरीची हमी उरलेली नाही. प्राध्यापक पदे वर्षानुवर्षे रिक्त राहतात, तर कराराधारित आणि तात्पुरत्या नियुक्त्यांचे प्रमाण वाढले आहे. अनेक पीएच.डी.धारक 'अतिपात्र पण अल्परोजगार' अशा अवस्थेत सापडतात. यामुळे तरुण संशोधकांमध्ये निराशा वाढत आहे. याचवेळी, 'ब्रेन ड्रेन' ही समस्या अधिक तीव्र होत आहे. विशेषतः विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधक जर्मनी, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अमेरिका यांसारख्या देशांकडे वळत आहेत. चांगली संशोधन सुविधा, पारदर्शक निधी व्यवस्था आणि स्पष्ट करिअर मार्ग यामुळे परदेशातील संधी अधिक आकर्षक वाटतात. पण अर्थात आता तेथेही अशी संधी फारशी उरलेली नाही ती डोनाल्ड ट्रम्प यांच्या अविवेकी मेंदूमुळे. संशोधन संस्कृती आणि मार्गदर्शन व्यवस्थाही तितकीच महत्त्वाची आहे. पीएच.डी. प्रवेशसंख्या वाढली असली तरी मार्गदर्शकांची क्षमता त्यानुसार वाढलेली नाही. काही ठिकाणी मार्गदर्शकांवर अतिभार असल्यामुळे योग्य मार्गदर्शनाचा अभाव, संशोधन पूर्ण होण्यास होणारा विलंब आणि दर्जाहीन प्रबंध तयार होण्याचे प्रकार दिसतात. संख्येला अधिक महत्त्व देताना गुणवत्ता, मौलिकता आणि नैतिकता याकडे दुर्लक्ष होत आहे. या सर्वसमस्यांच्या केंद्रस्थानी एक महत्त्वाचा मुद्दा आहे की, संशोधनाचे खरे महत्त्व आपण ओळखतो का? आजचा काळ हवामान बदल, सार्वजनिक आरोग्य संकटे, डिजिटल परिवर्तन आणि सामाजिक विषमता अशा गुंतागुंतीच्या आव्हानांनी भरलेला आहे. या सर्व समस्यांवर दीर्घकालीन उपाय शोधण्यासाठी सखोल आणि दर्जेदार संशोधनाची आवश्यकता आहे. संशोधन केवळ शैक्षणिक उपक्रम नसून, तो राष्ट्रनिर्मितीचा मूलाधार आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये लवचिकता, आंतरशाखीय अभ्यास आणि मजबूत संशोधन पायाभूत सुविधा यावर भर देण्यात आला आहे. चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आणि एकात्मिक पीएच.डी. मार्ग ही सकारात्मक पावले आहेत. मात्र, या धोरणांची अंमलबजावणी अद्याप असमान आहे. पुरेसा निधी, प्रशिक्षित प्राध्यापक आणि संस्थात्मक स्वायत्तता यांशिवाय ही सुधारणा कागदावरच राहण्याचा धोका आहे. समावेशकतेचा मुद्दाही अत्यंत महत्त्वाचा आहे. वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार संस्थांमध्ये प्रवेश, मार्गदर्शन आणि आर्थिक स्थैर्य यांचा अभाव जाणवतो. आरक्षण धोरणे असली तरी त्यांना पूरक अशी सहाय्यक व्यवस्था अपुरी आहे. विविधतेशिवाय संशोधनाची गुणवत्ता आणि व्यापकता दोन्ही बाधित होतात. या सर्व आव्हानांनंतरही, पीएच.डी. शिक्षण अप्रासंगिक झालेले नाही, उलट ते अधिक आवश्यक झाले आहे. कोणत्याही देशाला ज्ञानाधारित अर्थव्यवस्था घडवायची असेल, तर संशोधनात धोरणात्मक गुंतवणूक करणे अपरिहार्य आहे. यासाठी नियमित आणि पुरेशी फेलोशिप, वेळेवर निधी वितरण, पीएच.डी. नंतरचे संशोधन संधींचा विस्तार, उद्योग-शैक्षणिक सहकार्य आणि विविध करिअर मार्गांची मान्यता या बाबींची अंमलबजावणी करावी लागेल. आज आपल्याकडे पीएच.डी. शिक्षणासमोरील संकट हे एक इशारा आहे. या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्यास देशाची बौद्धिक संपत्ती आणि संशोधन नेतृत्व धोक्यात येऊ शकते. मात्र, दूरदृष्टी आणि ठोस धोरणात्मक पावले उचलल्यास, हीच व्यवस्था नवकल्पना, चिकित्सक विचार आणि राष्ट्रीय प्रगतीची शक्तिशाली यंत्रणा ठरू शकते. कारण संशोधन हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन नाही; ते समाज बदलण्याचे, ज्ञान निर्माण करण्याचे आणि भवितव्य घडवण्याचे माध्यम आहे. म्हणूनच, पीएच.डी. शिक्षणाला केवळ टिकवून ठेवणे नव्हे, तर त्याला सक्षम, समावेशक आणि दर्जेदार बनवणे ही आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे.

# वै. हभप मधुकर महाराज बारूळकर : सच्चा वारकरी, कीर्तनकार!

महाराष्ट्राला वैचारिक आणि सैद्धांतिक बैठक देणारा मूलगामी विवेक आणि विचारपूर्ण असणारा वारकरी सांप्रदाय हा साधारणतः तेराव्या शतकापासून कागदावर उतरलेला दिसतो. तसा तो अगोदरही महाराष्ट्र सारस्वतांवर आपलं अधिराज्य गाजवत होता; परंतु आद्य वारकरी संतशिरोमणी संत नामदेवराय महाराज, संत ज्ञानोबाराय आदी संतांच्या मांदियाळीने वारकरी संप्रदायाला वैचारिक, साहित्यिक अधिष्ठान मिळवून दिले. त्यात विशेषत्वाने नामदेव-ज्ञानदेव या संतद्वयांना समकालीन वारकरी संत जनाबाई, संत चोखोबाराय, संत सोयराबाई, संत कर्ममेळा, संत सावता महाराज, संत गोरोबाकाका, संत परिसा भागवत, संत कान्होपात्रा आदी अठरापगड जातीतील, बहुजन उपेक्षित, दुर्लक्षित समाजातील स्त्री-पुरुष संतांनी खांद्याला खांदा लावून सहकार्य केले. वारकरी सांप्रदायाची मूळ बैठक जात, धर्म, पंथ, लिंग भेदाच्या पलीकडे असून नामदेवादी संतांनी पंढरपूरच्या वाळवंटामध्ये अठरापगड जातीचे स्त्री-पुरुष वारकरी संतांना एकत्र करून वारकरी संप्रदायाची नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी या न्यायाने भजन, कीर्तन, लेखनाच्या माध्यमातून मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर अशाच क्रांतिकारी समता-ममतेच्या वारकरी संप्रदायाचा प्रचार-प्रसार पुढे येणाऱ्या शांतीब्रह्म संत एकनाथ आणि जगद्गुरु संत तुकोबाराय यांनी धर्म मार्तंडांना अंगावर झेलून मोठ्या ताकदीने पुढे आणला.

अलीकडे वारकरी सांप्रदायाची प्रचार-प्रसार करणारी फळी मोठ्या जोमाने महाराष्ट्रात उभी राहिली आहे. त्यात मागील



पंधरा-वीस वर्षापासून जेव्हा आम्ही स्वतः भजन-कीर्तन करत असताना, मराठा सेवा संघाच्या व्यासपीठावरून समता-ममतेचा विचार प्रसारित करत होतो; त्याच काळात ह.भ.प. मधुकर महाराज बारूळकर यांच्यासारखा वारकरी संप्रदायाचे मूलगामी चिंतन करणारा कीर्तनकार मोठ्या ताकतीने मराठवाड्याच्या मातीतून उभा राहिला. महाराजांची आणि माझी आत्तापर्यंत भेट जरी झाली नसली तरी माझे आणि त्यांची एकाच अखंड हरिनाम सप्ताहामध्ये अनेक कीर्तन झाल्याचे दाखले अखंड हरिनाम सप्ताह पत्रिकावर आहेत.

ह.भ.प.मधुकर महाराज बारूळकर यांचे कीर्तन म्हणजे अक्षरशः सडेतोड बारूद! भले तरी देऊ काखेची लंगोटी! नाठाळाचे माथी हाणू काठी !! या न्यायाने बेडरपणे, परखडपणे नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, तुकारामांच्या अभंगाचे विवेचन करताना बारूळकर महाराजांनी वारकरी सांप्रदायातील थोतांड-कर्मकांड इत्यादी खोट्या बाबींवर आपल्या वारकरी विचारांनी आसूड ओढले. बारूळकर महाराजांचे कीर्तन असो की व्याख्यान, त्यांनी इथल्या धर्ममार्तंडांना ठोकून काढले. असं असणारे व्यक्तिमत्व आज वारकरी संप्रदायामध्ये असे ज्येष्ठ असणारे बारूळकर महाराज आमच्यातून अपघाताने अचानक निघून गेले आणि खऱ्या वारकरी विचार व्यक्त करणाऱ्या महानुभावांमध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली!

आदरणीय ह.भ.प. वैकुंठवासी मधुकर बारूळकर महाराज, खऱ्या अर्थाने आज तुमची वारकरी संप्रदायाला गरज होती. वारकरी सांप्रदायात बोकाळलेला जातिवाद अवडंबर, विनाकारण घुसडले गेलेलं संस्कृत वाङ्मय, बडबड करणारी माणसं सगळीकडं बोकाळली असताना आपल्यासारखा सडेतोड कीर्तनकार, तुकाराम वेद सांगणारा वारकरी अचानक निघून जाणे ही वारकरी संप्रदायाची फार मोठी हानी आहे! आज अक्षरशः गावोगाव अखंड हरिनाम सप्ताहामध्ये विविध भाकडकथा आणि पैशांचा बाजार सुरू आहे; अशा काळात आपल्यासारख्या बारूद होऊन बरसणाऱ्या महाराजांची वारकरी संप्रदायाला नितांत गरज होती! महाराज आज आपण आमच्यातून अचानक निघून गेलात, प्रचंड दुःख झाले! महाराज आज सुरू असलेला जो धर्माच्या नावाखाली बीभत्स बाजार सुरु आहे, तो पाहून प्रचंड वेदना होतात. मनाला प्रश्न पडतो हाच का ज्ञानोबा तुकोबा, एकोबा आणि नामदेवाचा महाराष्ट्र? हाच का ज्योतिरावांचा, सावित्रीबाईंचा, बाबासाहेबांचा महाराष्ट्र? हाच का गाडगेबाबा, तुकडोजी बाबांचा महाराष्ट्र? अशी भयावह परिस्थिती असताना वारकरी संप्रदायाला आपल्यासारख्या विवेकवादी, चिंतनशील, सडेतोड वारकरी विचार प्रसारकाची नितांत गरज असताना आपण अचानक निघून गेलात! आज अगदी बोटावर मोजण्याएवढी खरं वारकरी कीर्तनकार बाकी असताना आपल्यासारखा माणूस निघून जाणं ही खऱ्या अर्थाने वारकरी सांप्रदायाची आणि वारकरी विचारांची अपरिमित हानी आहे! आपला विचार, आपलं कीर्तन आणि आपलं एकूणच जीवन वारकरी सांप्रदायासाठी गेलं आणि त्यातच आज आपण अचानक निरोप घेत आहात याचं अतिव दुःख होत आहे!

असो. उपजल्या पिंडाते मरण सांगाती या न्यायाने आपण जगाचा निरोप घेत आहात त्याबद्दल आपल्या क्रांतिकारी कार्याला कोटी कोटी वंदन! महाराज आपण निघून गेलात तरी आपल्या विचारांची परंपरा मोठ्या ताकदीने आम्ही पुढे घेऊन जाऊ! हीच ग्वाही देतो आणि श्री पांडुरंग चरणी आपल्याला चिरशांती लाभो ही विनम्र प्रार्थना करतो आणि थांबतो!

जिंदगी में इतनी शिद्दत से
अपना किरदार निभाओ कि,
पर्दा गिरने के बाद भी
तालियां बजती रहें।

या शब्दांसह आदरणीय वै. बारूळकर महाराज आपणास विनम्र भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो! जय जय रामकृष्णहरी! जय जिजाऊ! जय शिवराय! जय ज्योती! जय भीम!

-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी
मो.९१५८०६४०६८

# जिंदगी की मेले...चलते ही रहेंगे!





जन पळभर म्हणतील हाय हाय
मी जाता राहील कार्य काय ?

प्रसिद्ध कवी भा. रा. तांबे. यांच्या कवितेतील या ओळींची शीर्षस्थानी मांडणी यासाठी, की आजच्या भौतिक समृद्धीने नटलेल्या समाजात, नाशवंत देहाला चिकटून बसलेल्या व त्या देहाचे चोचले पुरवणाऱ्या माणसाची अवस्था हास्यास्पद झाली असून, वरील ओळींतून स्पष्ट लक्षात येते की, मनुष्याचे जीवन क्षणभंगुर असून, पृथ्वीतलावरील अनिश्चित गोष्ट जर कोणती असेल तर ती माणसाला लाभलेले औटघटकेचे जीवन. मगे हे असे असूनसुद्धा, आजचा माणूस, हे लाभलेले शरीर कधीच न संपणारी संपत्ती असल्यासारखे जगतो. माणसाला वाटतं, की पृथ्वीतलावरील कार्य मी गेल्यावर संपेल की काय? नेमके हेच आभासी विचाराचे चे पांघरूणवरील ओळी दूर करतात. वास्तव तर हेच आहे की, पृथ्वीच्या किंवा मानव सृष्टीच्या निर्मितीपासू चराचरातील प्रत्येक घटक, अथवा मानव उत्पत्ती, स्थिती व समाप्ती या न्यायाने जगत व मरत असतो. जन्म व मृत्यू ह्या जीवन रुपी नाण्याच्या अटळ वास्तविक बाजू असून, ही गोष्ट लक्षात घ्यायला आजचा आधुनिक माणूस तयार होत नाही. परंतु वास्तवापासून आपण दूर गेलो तरी ते वास्तव मिटणार नसते किंवा सूर्याचा प्रकाश लपवण्यासाठी कितीही पडदा लावला तरी तो प्रकाश आपण लपवू शकत नाही. तद्वतच आपण या क्षणभंगुर शरीरास, जीवनास कितीही चिकटून बसलो, तरी एक दिवस याचा अंत निश्चित आहे . जर हे असे असेल, तर या कवडीमोल देहाचा आपण किती लोभ बाळगावा? त्याच्या मोहात आपण किती काळ अडकावे ? हा चिंतनाचा विषय आहे.

मैं पल दो पल का शायर हू
पल दो पल मेरी कहानी है

ह्या वरील ओळी आपणास या वास्तवाची आठवण करून देतात की जीवनाच्या रंगमंचावरीलआपण वेगवेगळे नट व कलाकार असून, आपली भूमिका आपण वटवत असतो व त्या भूमिकेला एका दिवशी नक्कीच पूर्णविराम लागणार असतो. म्हणून आपल्या जीवनाची कहाणी, अनिश्चित काळासाठी व क्षणाची असते म्हणून या अनिश्चीत असलेल्या जीवनरूपी कथेला, भूमिकेला अनुसरून व स्वीकारून तसेच विनाशी शरीराला चिकटून न राहता, भा. रा. तांबे यांच्या शब्दात सांगायचे झाले तर, आपल्या येण्याने व जाण्याने, पृथ्वीतलावरील कुठलीच कार्य बंद पडत नाही, चंद्र सूर्य व तारका यांचे कार्य अखंड चालू राहते, तसेच माणसाच्या जाण्याने कुठलेच कार्य बंद पडत नसते, म्हणून अविचारी माणसाने ही बाब कटाक्षाने लक्षात घेऊन, जीवन आनंदाने जगून त्यात इतरांना आनंद वाटून, इतरांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन, आपल्या सकारात्मक कार्याची छाप समाजावर ठेवून एक दिवस या जगाचा निरोप आपल्याला घ्यायचा आहे याचे आत्मभान ठेवून जर हे जीवन जगले, तर माणसाच्या जीवनातील दुःख कमी व्हायला मदत होईल.

कोरोना काळात अनेक माणसे मृत्यूच्या गावाला गेली. ती माणसे गेली म्हणून समाजाचे कार्य बंद पडले नाही. वास्तव तर हेच आहे, की कुणाच्यातरी जाण्याने काही दिवस लोक शोक करतील, आप्त नातेवाईक दुःख व्यक्त करतील, परंतु कुणाचेही जगणे थांबणार नाही म्हणून मनुष्याने नियतीच्या या कठोर वास्तवाच पालन करून, आपल्याला भूमिका वठवण्यााठी जेवढा काळ लाभलेला आहे, त्या काळाचा सुंदर व सकारात्मक उपयोग करून जीवन जगले, व भौतिक जीवनास चिकटून विनाशी शरीराचे लाड पुरवण्याच निरर्थक कार्य बंद केल व जीवनाला वैचारिक व वास्तविक दृष्टीने पाहिले तर सत्य हेच आहे की,

ये जिंदगी के मेले
दुनिया मे कम नही होंगे
मगर अफसोस हम नही होंगे

वरील ओळीमध्ये म्हटल्याप्रमाणे, जीवनसृष्टी चालत आलेली आहे, व ती पुढेही तशीच चालत राहील, त्यामुळे प्रत्येकाने जीवन जोपर्यंत आहे तोपर्यंत आनंद वाटावा, आपल्या जीवनातून माणुसकीचे अप्रतिम दर्शन घडवाव. श्रीमंतीत अहंकाराने न माजता, जीवनाला विनम्रतेने जगावे. ही जीवनरूपी यात्रा चालतच राहणार आहे, मात्र हेही तेवढेच निश्चित, की प्रत्येकच यात्रेचा लाभ आपणास घेता येणार नाही, आपणास प्रत्येक यात्रेचा लाभ घेता येणार नाही, याचा अर्थ यात्रा होणार नाही असा निश्चितच होत नाही. म्हणून सृष्टी केवळ आपल्या मुळे आहे, व माझ्यानंतर तिचे काय याची निरर्थक चिंता न करता, मला लाभलेल्या आयुष्यातून मी माझ्या नंतरही लोकांच्या स्मरणात कसा राहील, याकडे लक्ष देऊन आपले कार्य आदर्श बनवण्याचा ,प्रांजळ प्रयत्न करणे एवढेच आपल्या हातात आहे. आयुष्याचा पहिला टप्पा जन्म, दुसरा टप्पा जीवन व तिसरा टप्पा मृत्यू असून मधल्या टप्प्याचे सुवर्ण करण्याची संधी आपल्याच हातात आहे.

आपल्या मातृभूमीला लाभलेल्या थोर महापुरूषांची परंपरा आपणास काय शिकवते? तर मनुष्य केवळ शरीराने विनाश पावतो पण त्याचे कार्य व विचार हे अविनाशी व अमर असतात.आपल्या कार्यातून आदर्श चमत्कार घडवल्या शिवाय इतरांच्या मनात नमस्काराची भावना जागृत करता येत नाही. म्हणून, आपल्या जीवनाच गीत गाताना, केवळ आपण एकटेच गायक नाहीत, आपल्या नंतरही या धरतीवरती अनेक गायक येणार आहेत व त्यानंतर ही जीवनाच गीत ते गानारच आहेत.. हे सत्य आहे व ते शाश्वत आहे. डोळ्यांना न दिसणाऱ्या पण मनाला जाणवणाऱ्या कार्याची छाप किंवा कर्तुत्वाचा चमत्कार हा कायमस्वरूपी राहतो. त्यामुळे विनाशी शरीराच्या मोहात न अडकता, वास्तवाचे भान ठेवून समाज उपयोगी कार्य आपल्या हातून घडले, तर ते काळाच्या पडद्यावर कायम राहील. डोळ्यांना दिसणारी प्रत्येक मूर्त बाब, ही विनाशी व लोप पावणार आहे, ही खूणगाठ मनाशी बांधल्यावर या जीवनाचा अनिश्चित प्रवास सुद्धा आनंदी करता येतो. आपल्या नंतर येणाऱ्या पिढीला, आपल्या आदर्श जीवनाची पायवाट घालून दिली, तर ती पायवाट निश्चित अमर असणार आहे,रस्ते कधीच नष्ट होत नसतात तर त्यावरून चालणारी माणसे संपतात, म्हणून वैचारिक अविनाशी रस्ते किंवा वाटा आपण निर्माण करून ठेवल्या तर, पुढच्या पिढीच्या आपण कायम स्मरणात राहू.

कुठल्याच मनुष्याला अमरत्वाचे वरदान लाभलेले नसल्यामुळे, मी अमर राहील या अविर्भावात जीवन जगणे ही धोक्याची घंटा असून, काळाच्या पाऊलखुणा वेळीच लक्षात घेतल्या तर जीवनाचा प्रत्येक क्षण आनंदाने जगता येईल. काळ व मृत्यू यांच्या निष्ठूर जबड्यातून कुणाचीच सुटका होऊ शकत नाही ही बाब माहिती असून सुद्धा, त्याकडे दुर्लक्ष करून अमरत्वाचे वरदान मिळल्यागत जगणे म्हणजे शुद्ध वेडेपणा होय. त्यामुळे आपण आपल्याला जेवढी भूमिका मिळाली आहे तेवढी प्रांजळपणे निभावत जाणे व आपल्या भूमिकेचा आदर्श पुढच्या पिढीसाठी निर्माण करून देणे, हे एवढे कार्य मात्र आपण निश्चित करू शकतो.

अनिश्चित अशा जीवन काळात, महापुरुषांनी युगानुयुगे चालणारे अविनाशी कार्य निर्माण केले आहे, म्हणून अशा प्रकारच्या कार्याला मात्र कधीच अंत नसतो.... हेही तेवढेच खरे.

-प्रा. अमित शिंदे
मु. पो. रोहिपिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

# मानवी स्वभावाचे वेगळेपण...

व्यक्ती तितक्या प्रकृती
असं म्हणणं बरोबर आहे
निरीक्षण करा तुम्ही जरा
सर्व स्वभावपैलू सापडतील...

मागे दोन दिवसांच्या पूर्वी एका लग्नसभारंभात गेलो होतो.लग्नातील विविध सोपस्कार पार पाडत असतांना वेळ किती झाला हे कळलेच नाही. वेळेचा मुहूर्त त्यांच्याहातातून सुटून जात होता. लग्नात वर-वधू पक्षाला आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित झालेल्या वऱ्हाडी मंडळींची चुलबुल, चर्चा सुरू झाली.मनुष्याला सवड मिळाली की,एकमेकांचे उणे-दुणे काढायला मागे पुढे पाहत नाही.परस्परांच्या खोड्या करून क्षणिक समाधान मिळवत असते परंतु ज्यांच्याविषयी बोलतो त्यांच्या गोष्टी त्याच्यासमोरच बोलल्यास दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल पण एकमेकांच्या आत्म्याला ठेस पोहचेल असं बोलणे म्हणजे गैरसमज निर्माण करून एकमेकांच्या मनात आकस निर्माण करणे होय.कोणतेही सण असो वा समारंभ त्यात चुका तर होणारच पण त्यातील केवळ आणि केवळ चुका शोधून इतरांचे मन कलुषित करण्याचा घाट काही मानवी समूह करतात हे एक मानवी स्वभावाचा दोष आहे.

जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीअसं म्हणतात ना! हे अगदी खरं आहे. काही इतके भांडखोर, चुगलखोर असतात की, ज्या ठिकाणी जातील त्या ठिकाणी भांडणेच लावून परत येतील त्यामुळे प्रत्येकाचा स्वभाव लक्षात घेऊन आचरण करायला हवे.एक बाब प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवी की,आपली दृष्टी व दृष्टिकोन कसा आहे त्यावर साऱ्या बाबी अवलंबून आहेत.पेराल तसे उगवेल या म्हणीप्रमाणे वर्तन करणे अतिशय योग्य होईल. प्रत्येक बाबतीत चुका शोधून चुकांचे भांडवल करून नकारात्मक बीज समाजात पेरणाऱ्या व्यक्ती वा समूहापासून दूर असायला हवे कारण एक नकारात्मक बाब आपल्या मनात असलेल्या दहा सकारात्मक विचारांना बाजूला सारत असते.आपल्या विचाराशी समरस होणारे मानवी स्वभावाचे व्यक्ती एकत्र असायला हवे. प्राचीन काळापासून तर आता आधुनिक काळात देखील डोकावून बघितल्यास विश्वासघात,धोका, दगा-फटका हे आपल्या अवतीभवती आचरण करणाऱ्या व्यक्तीनेच दिलेला आहे त्यामुळे एखाद्या व्यक्तीवर विश्वास ठेवतांना अंधपद्धतीने नको तर डोळसपद्धतीने विश्वास ठेवायला हवा अन्यथा तुमच्या विचाराला वा स्वभावाचा फायदा घेण्यासाठी टपून बसलेलेच असतात.

नेहमी सत्य बोलावे व सत्याचीच कास धरावी असे अनेक संत महापुरुषांनी आपल्या मानव जातीला सांगितले आहे.मानवाच्या वृत्तीत आणि नितीत बदल झाल्याने स्वार्थीभावना अधिकच बळावत आहे म्हणून खोटे बोलतो नि रेटून बोलतो अशी ही मानवी स्वभावाची विचित्र व्यथा देखील बघायला मिळते आणि काही तर ठगास ठक महाठग देखील नजरेत पडतात.इतरांची कुचेष्ठा करून स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असतात पण अशी प्रतिष्ठा वाढवत असतांना इतरांना कमी दर्जाची,हीन वागणूक देऊन आपण श्रेष्ठ असण्याचा आव आणणे हे चुकीचे आहे. मांजराने दूध कितीही लपूनछपून पिण्याचा प्रयत्न केला तरी जाणीव होतेच.अगदी तसेच आहे त्यामुळे टवाळकी करून फुशारकी मारण्यापेक्षा इतरांचा सन्मान केल्यास अगदी समर्पक व योग्य होईल.

स्वभावाला औषध नाही असं म्हटलं जाते पण स्वभावातील दोष बाजूला काढणे हे आपल्याच हातात आहे तर काहींचा असा सूर असतो की, आपण जे करू तेच योग्य म्हणजे हट्टीपणा, आततायीपणा आपल्या जीवनात कामी नसतोच. इतरांचे मत, विचार ध्यानात घेऊनच इतरांचे स्वभावातील वेगळेपण समजून घ्यायला तुम्हाला वाव आहे. मानवाचा मूळ स्वभाव बदलविता येत नसला तरी वैचारिक बाबतीत नकारात्मक ते सकारात्मक असा स्वभावाचा प्रवास आपल्याला निश्चितच करता येईल.अती प्रमाणात राग, चिडचिडेपणा योग्य नाही. नैराश्यतेच्या गर्तेत राहणाऱ्या मानवी स्वभावाच्या व्यक्तीने नकारात्मकतेचे बीज पेरू नयेत. प्रत्येक व्यक्तीने सकारात्मक विचारांची वा सत्याची कास घेऊन मार्गक्रमण व्हायला हवे. नैराश्य, उदास, निराश व्यक्ती इतरांच्या आयुष्यात उजेड आणण्यासाठी प्रयत्न करेल अशी आशा बाळगू नका. नैराश्यवादी व्यक्तीपासून सकारात्मतेच्या विचार पेरणाऱ्या व्यक्तीने दूर राहणे हेच उचित ठरेल अश्या विविधांगी प्रकारचे मानवी स्वभावातील वेगळेपण तुम्हाला क्षणोक्षणी सापडतील हे मात्र खरे आहे.

-दुशांत बाबुराव निमकर
शब्दांकुर फाऊंडेशन, चंद्रपूर
मो.नं : ९७६५५४८९४९

# विद्यापीठ आणि मनपा यांच्या समन्वयाने शहराचा कायापालट करता येईल -कुलगुरू डॉ. मनोहर चासकर



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वार्षिक स्नेहसंमेलन 'ज्ञानतीर्थ २०२६'च्या उद्‌घाटन समारंभाचा बुधवार, दि. १ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ झाला. या सोहळ्याने सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांच्या पर्वाची दिमाखदार सुरुवात झाली.

विद्यापीठ परिसरातील विविध संकुलांतील विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. प्रमुख पाहुण्या म्हणून नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे, तर विशेष उपस्थितीत किनवटचे आमदार भीमराव केराम हे होते. तसेच व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बी. एस. सुरवसे यांचीही विशेष उपस्थिती लाभली. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रभारी प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. चासकर यांनी समाजाच्या प्रगतीसाठी विद्यार्थ्यांनी पुढे येत नव्या कल्पना मांडाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची मागणी करण्यात आली असून विद्यार्थी सकारात्मक प्रतिसाद देतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी महिला सक्षमीकरण व स्वच्छता क्षेत्रात कार्य करणाऱ्या कविताताई यांच्या कार्याचा उल्लेख करण्यात आला. नांदेड शहरातील नागरिकांच्या विविध समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शहर विकासासाठी उपक्रम राबविल्यास शहराचा निश्चितच कायापालट होईल यासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

किनवटचे आमदार भीमराव केराम यांनी किनवट भागातील आदिवासी समाजाबद्दल सामाजिक भूमिका व्यक्त केली. किनवट परिसरातील आदिवासींचे सांस्कृतिक वैभव आणि कला जोपासण्याचे काम महाराष्ट्र शासनातर्फे होत आहे. यामध्ये विद्यापीठाची भूमिका महत्वाची आहे.

याप्रसंगी राष्ट्रीय युवक महोत्सवातील विजेत्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या यशाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रभारी प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांनी केले. 'ज्ञानतीर्थ २०२६'च्या निमित्ताने विद्यापीठ परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी दिवसांत विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे.

महापौर कविता मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना युवकांनी केवळ स्वत:पुरते मर्यादित न राहता कुटुंब, समाज आणि देशाच्या विकासासाठी आपल्या शिक्षणाचा उपयोग करावा, असे आवाहन महापौरांनी केले. भारतीय संस्कृतीत कुटुंब संस्था अत्यंत महत्त्वाची असून कुटुंब सशक्त केल्याशिवाय समाज आणि देश सुदृढ होऊ शकत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

राष्ट्रीय युवक महोत्सवातील विजेत्यांचा सन्मान करताना त्यांनी त्यांच्या परिश्रमाचे कौतुक केले. यश सहज मिळत नाही, त्यासाठी कठोर मेहनत व सातत्य आवश्यक असते. नांदेड शहराच्या विकासासाठी विद्यापीठाची आणि विद्यार्थ्यांच्या संशोधनाची निश्चितच मदत घेण्यात येईल. यासाठी विद्यापीठ प्रशासनाने आम्हाला मार्गदर्शन करावे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नांदेड महानगर पालिका सदैव कटीबद्ध आहे.

युवकांनी चांगल्या सवयी अंगीकाराव्यात, पुस्तकांशी मैत्री करावी, योग्य संगत ठेवावी व प्रश्न विचारण्याची सवय जोपासावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले. तसेच विद्यापीठ व स्थानिक स्वराज्य संस्था एकत्रितपणे कार्य केल्यास सक्षम, संस्कारित व स्वच्छ समाज घडविणे शक्य असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'मिशन लक्ष्यवेध' उपक्रमांतर्गत जिल्हास्तरावर खेळाडू निवड चाचणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत राज्यातील विकासाकरिता मिशन लक्ष्यवेध या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत खेळाडू निवड चाचणी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी प्रसिद्धीस दिली आहे.

या चाचणीमध्ये विविध क्रीडा प्रकारांतील होतकरू व गुणवान खेळाडूंना प्रोत्साहन व पुरस्कार, खेळाडूंना करिअर मार्गदर्शन, खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी, विदेशी संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित करणे अभिप्रेत आहे. उपरोत घटक विकसीत करण्याकरीता आवश्यक प्रयत्न हे फक्त राज्यस्तरावरून नव्हे तर जिल्हास्तरावरून देखील होणे अपेक्षित आहे. त्याकरिता नांदेड जिल्ह्यास मिशन लक्ष्यवेध या योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर प्रतिभा विकास केंद्र नांदेड करिता टेबल टेनिस, बॅडमिंटन, आर्चरी, हॉकी, ॲथलेटीक्स या पाच क्रीडा प्रकारांच्या खेळांची केंद्रे सुरू करावयाचे आदेश प्राप्त झाले होते. परंतु २९ मार्च २०२६ रोजी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या ऑनलाईन बैठकीतील चर्चेनुसार आर्चरी, हॉकी व ॲथलेटीक्स या खेळांचे जिल्हा क्रीडा संकुल या मैदान उपलब्ध नसल्यामुळे जिल्हा प्रतिभा केंद्र अंतर्गत आर्चरी, हॉकी व ॲथलेटीक्स खेळ रद्द करण्यात आले आहेत याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे कळविण्यात आले आहे.

या निवड प्रक्रियेदरम्यान खेळाडूंची शारीरिक क्षमता, तांत्रिक कौशल्य, मानसिक तयारी तसेच खेळातील कामगिरी यांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. अनुभवी प्रशिक्षक व तज्ज्ञांच्या उपस्थितीत ही निवड चाचणी पार पडणार आहे. या उपक्रमाचा उद्देश गुणवंत खेळाडूंची निवड करून त्यांना उच्चस्तरीय प्रशिक्षण देणे व राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी तयार करणे हा आहे.

खालीलप्रमाणे निवड चाचणी ठिकाण व खेळप्रकार नमूद करण्यात आलेले आहेत.

१) टेबल टेनिस २) बॅडमिंटन या खेळाची निवड चाचणी दि. २ एप्रिल २०२६ वेळ सकाळी १० वा. जिल्हा क्रीडा संकुल इनडोअर हॉल, नांदेड संपर्क क्रं. चंद्रप्रकाश होनवडजकर (रा.क्री.मा.) मो. ७९७२९५३१४१, हानमंत नरवाडे मो.९६०४८६६२५३.

**खेळाडू निवड चाचणीचे निकष व पात्रता–** १. वयोमर्यादा २१ वर्षाआतील मुले/मुली त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी, जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधारकार्ड, गत २ वर्षातील क्रीडाविषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज ३ फोटोग्राफ, शाळा, महाविद्यालयीन बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र इ. ३. महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असला पाहिजे ४) क्रीडा कामगिरी– किमान राज्यस्तरावरील सहभाग किंवा पदक प्राप्त खेळाडू) (शालेय/संघटना अधिकृत स्पर्धा) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुस्ती फिटनेस चाचण्यामध्ये पात्र होणे आवश्यक आहे. ५) शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य आहे. वरील सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत.

या निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी इच्छुक खेळाडूंनी संबंधित आयोजकांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी सुचविले आहे. अधिक माहितीसाठी चंद्रप्रकाश होनवडजकर राज्य क्रीडा मार्गदर्शक– मो.७९७२९५३१४१ यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# अस्थिव्यंग शाळा बंद करण्याच्या निर्णयाविरोधात कर्मचाऱ्यांचे निवेदन



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, विशेष शाळांमधील विद्यार्थ्यांचे टप्प्याटप्प्याने सर्वसाधारण शाळांमध्ये समायोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परंतु अस्थिव्यंग शाळेतील शिक्षक, कर्मचारी यांच्या समायोजना बाबत अद्याप निर्णय झाला नाही. शासनाच्या या धोरणाविरोधात दिव्यांग शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी आपल्या न्याय्य हक्कासाठी निवेदन दिले आहे.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, शाखा दिव्यांग विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने अस्थिव्यंग शाळा बंद करण्याच्या शासन निर्णयाविरोधात सोमवारी नांदेड जिल्हा परिषदेत निवेदन देण्यात आले. दिव्यांग विभागाचे मुख्य संघटक तथा वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार ढवळे यांच्या नेतृत्त्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांची भेट घेतली. यावेळी शासनाने घेतलेल्या अस्थिव्यंग शाळा बंद करण्याच्या निर्णयाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

कर्मचाऱ्यांचे समायोजन पूर्ण होईपर्यंत त्यांचे वेतन थांबवू नये, तसेच त्यांच्या भवितव्याचा विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा, अशा भावना शासनापर्यंत पोहोचवाव्यात, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी मुक्कावार यांनी आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी आहोत, असे आश्वासन देत तत्काळ हे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे वर्ग केले. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष भीमराव कांबळे यांच्यासह अस्थिव्यंग शाळेतील अनेक शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# रामनवमीनिमित्त आयोजित महादेव यात्रा उत्साहात संपन्न

**शंकरनगर (प्रतिनिधी)** –रामनवमीचे औचित्य साधून रामतीर्थ परिसरात आयोजित महादेव यात्रा उत्साहात पार पडली. या यात्रेत पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी उत्स्फुर्त सहभाग दर्शविला.

बिलोली तालुक्यातील रामतीर्थ, किनाळा, डोणगाव, हिप्परगा माळ, धुप्पा आदी गावांतील यात्रा शांततेत व भक्तीमय वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडली.

रामतीर्थ परिसरात दरवर्षी रामनवमी, महादेव यात्रा तसेच विविध देवांच्या यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. किनाळा येथे तीन गावांच्या वतीने महादेव मंदिर यात्रा, रामतीर्थ येथे रामनवमी यात्रा, तर डोणगाव येथे महादेव यात्रा भरवली जाते. या यात्रांमध्ये पारंपरिक कार्यक्रमांसह विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम घेतले जातात.



ग्रामीण भागातील यात्रांमध्ये अवैध मार्गाचा अवलंब केला जात असे, मात्र यंदा रामतीर्थ पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लक्ष घातल्यामुळे यात्रेमधील 'गुडगुडी'सह विविध जुगार खेळाला आळा बसला आहे. या प्रकारामुळे यात्रेकरूंची आर्थिक लूट थांबली असल्याचे ग्रामस्थांनी सांगून समाधान व्यक्त केले आहे. यात्रेतील अवैध प्रकाराला आळा घालण्यासाठी सपोनी विक्रम हराळे यांनी पुढाकार घेऊन यात्रा नियोजन समित्यांना अवैध धंद्याला आळा घालण्याच्या हेतूने सुचना दिल्या होत्या. त्यांच्या सुचनेचे पालन करून यात्रा आयोजन समितीनेही सहकार्य केल्यामुळे रामतीर्थ पोलीस स्टेशन हद्दीतील महादेवांची यात्रा शांततेत आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडली.

गुडगुडीसारख्या अवैध प्रकाराला आळा घालून पोलीस प्रशासनाने समाजहिताचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यात्रांचे स्वरूप अधिक सकारात्मक झाले असल्याची प्रतिक्रिया डोणगाव येथील माजी प्राचार्य श. मा. डोणगावकर यांनी दिली आहे.

रामतीर्थ पोलिसांनी घेतलेल्या या ठोस भूमिकेमुळे परिसरातील यात्रा अधिक सुरक्षित, शांततामय आणि भक्तीपूर्ण वातावरणात पार पडत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

रामतीर्थ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील विविध गावांमध्ये दरवर्षीप्रमाणे यात्रा भरविण्यात आली. या वर्षी प्रत्येक गावात यात्रा शांततामय आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडली असून, या यात्रेला कुठेही गालबोट लागले नसल्याचे पोलीस प्रशासनाने सांगितले आहे.

# प्रा. प्रभू कोकणे यांचे देहदान



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा देणारे तसेच ज्यानी दलित, मुस्लीम व अल्पसंख्याक यांचे आरक्षण व संवैधानिक समस्यांवर विपुल लिखाण व चळवळ केली. ज्येष्ठ समाजसेवक तथा प्राध्यापक कै. प्रभू नागगोंडा कोकणे (वय ८५ वर्षे) यांचे सोमवार, दि. ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजता दीर्घकालीन आजाराने निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या पार्थिवाचे देहदान करण्यात आले.

प्रा. कोकणे यांनी धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) आरक्षण मिळावे यासाठी व्यापक जनआंदोलन उभारले होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजकार्याला वाहून घेतले. तन, मन आणि धनाने समाजासाठी कार्य केले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. प्रशांत कोकणे, प्रवीण कोकणे आणि प्रकाश कोकणे यांचे ते वडील होत. त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या पार्थिवाचे देहदान नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी येथे करण्यात आले आहे.

**पान १ वरून...**

**महापालिकेच्या १ हजार ३०७ कोटी...**

वाहतूक लक्षात घेता नवीन सिग्नल यंत्रणा उभारली जाणार आहे. वजिराबाद चौक, आयटीआय चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक व वर्कशॉप कॉर्नर येथे शंभर मिटरपर्यंत नो पार्किंग नो हॉकर्ससह अत्याधुनिक ट्रॉफिक सिग्रल बसविण्यात येणार आहेत.

शहरातील नागरिकांच्या पाणीपुरवठा संदर्भात समस्या सुरळीत करण्यासाठी जल-बेल हे मोबाईल ॲप सुरू करण्यात येणार असून, या ॲपमुळे नागरिकांना त्यांच्या भागातील पाणीपुरवठ्याची वेळ व अद्यावत माहिती सहज उपलब्ध होणार आहे. विष्णुपुरी व किवळा साठवण तलावमध्ये मुबलक पाणीसाठा असल्याने नदिड शहराला कोणतीही पाणीटंचाई भासणार नाही. महापालिकेकडे महावितरणची ४८ कोटी रुपये व पाटबंधारे विभागाचे २२ कोटी रुपये देणे बाकी आहे. तसेच कंत्राटदाराचे महापालिकेकडे ९८ कोटी रुपये देणे बाकी असल्याचे आयुक्त डॉ. डोईफोडे यांनी सांगितले. महापालिकेवर ९८ कोटी रुपयांचे कर्ज असून, या कर्जाच्या हप्त्याची नियमित परतफेड सुरू आहे. एका वित्तीय संस्थेकडून शंभर कोटी रुपयांचे कर्ज महापालिकेला मंजूर झालेले असून सदरील कर्ज महापालिकेला प्राप्त होणार आहे. महापालिकेच्या सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे देणे, वाढीव भूसंपादनाचा मावेजा, सातवा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम, महावितरण व पाटबंधारे विभागाचे नियमित देयके यामुळे खर्चामध्ये वाढ होत आहे. तरीही प्रशासन खर्चामध्ये बचत करुन नागरिकांना आवश्यक सेवा, दैनंदिन स्वच्छता, पाणीपुरवठा व इतर आवश्यक सुविधा सुरळीत राहण्यासाठी प्रयत्नशील आहे. २०२६ व २०२७ मध्ये २००.९७ कोटी पाणीपट्टी कर व २३८.१८ कोटी मालमत्ता कर थकीत आहे. यावर्षी १३७.१२ कोटी मालमत्ता कर ४३.३७ कोटी रुपये कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सांगितले.

------------

**विष्णुपुरी येथील ग्रामीण...**

१७४ प्रमाणे गुन्हा नोंद दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रेखा काळे हे अधिक तपास करीत आहेत. मयत यांच्या नातेवाईकांनी मात्र घातपात असल्याचा संशय व्यक्त केला असून, या प्रकरणी मुलीचा भाऊ या पॉलटेक्निकलमध्ये शिकत असून, त्यांनाही माहिती न देता परस्पर मयताचे प्रेत शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. या प्रकरणी संबंधित प्राचार्य व वार्डन यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी वांघी ता.हिमायतनगर येथील मयताचे वडील दत्तात्रय खंडारे व सामाजिक कार्यकर्ते माधव देवसरकर, राम सूर्यवंशी यांच्यासह नातेवाईक यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांची भेट घेऊन संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

# बहुभाषिक ब्राह्मण महासंघाच्यावतीने उद्या सामूहिक मौंज मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –अखिल भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघ जिल्हा शाखा नांदेडच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी दि. ३ एप्रिल रोजी सामूहिक मौंज मेळाव्याचे आयोजन केल्याची माहिती बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष बंडोपंत कुंटूरकर यांनी दिली.




अखिल भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघ जिल्हा शाखा नांदेड समाजाच्या विविध कार्यात सहभागी असून सामूहिक मौंज मेळावा शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी संपन्न होत आहे. साई लॉन्स मालेगाव रोड नांदेड येथे सामूहिक मौंज दि. ३ एप्रिल रोजी सकाळी ११.२६ मि. वाजता संपन्न होणार आहे. महासंघाचे सामूहिक मौंज मेळाव्याचे हे चौथे वर्ष असून मौंज मेळावा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात संपन्न होत असतो.

या मेळाव्यात यावर्षी सात बटूंवर उपनयन संस्कार होणार असून, या मेळाव्यास परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले, बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश मुळे, बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष परळी वैजनाथ, निखिल लातूरकर अध्यक्ष अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, बालासाहेब पांडे अध्यक्ष अभिनव भारत शिक्षण संस्था नांदेड यांचेसह आदी प्रमुख अतिथींची उपस्थिती राहणार आहे. तर बटूंस शुभाशीर्वाद देण्यास वे.शा. सं. विश्वास शास्त्री घोडजकर, खंडू गुरू आसोलेकर, गोविंद गुरु, गिरीश गुरु वाढोणकर यांची उपस्थिती राहणार आहे. समाज बांधवांनी सर्व बटूस शुभाशीर्वाद देण्यास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष बंडोपंत कुंटूरकर यांचेसह सर्व कार्यकारिणीने केले आहे.

# बारड येथे भगवान महावीर जन्म कल्याणक सोहळा उत्साहात; सदाचार आचरणाची सामूहिक शपथ

**मुदखेड (प्रतिनिधी)–** जैन बांधवांच्या वतीने भगवान महावीर २६२५ वा जन्म कल्याणक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त अहिंसा, सत्य, अपरिग्रह, करुणा या सार्वकालिका सदाचार मूल्यांचे आचरण करण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.



मुदखेड तालुक्यातील बारड येथे जैन समाज बांधवांच्या वतीने २४ वे तीर्थंकर भगवान महावीर जन्म कल्याणक सोहळ्याचे आयोजन मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी करण्यात आले होते. यानिमित्त फुलांनी मंदिराची सजावट करण्यात आली होती. भगवान महावीरांच्या मूर्तीचे प्रशाळा करून विधिवत पूजन करण्यात आले. मंत्रोपचाराने मंगलध्वनीत सवळे परिधान करून महाअभिषेक पूजा करण्यात आली. यानंतर गावातील प्रमुख रस्त्यांवरून भगवान महावीरांच्या पालखीची शोभायात्रा ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आली. गावात ठिकठिकाणी पालखीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी अहिंसा परमोधर्म हा संदेश देण्यात आला.

भगवान महावीर जयंतीच्या पूर्वसंध्येला विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जैन बांधवांच्या वतीने सर्व धर्मीयांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. जनकल्याणक सोहळा यशस्वीतेसाठी रमेशचंद्र महाजन, कचरू झरकर, महावीर महाजन, प्रेमचंद चवरकर, अशोक महाजन, कांताराव घोडे, महावीर भूमकर, धनंजय भूमकर, प्रदीप पंचभाई, राजेश बोंदार्डे, भरत बोंदार्डे, केवल पोकळे, दीपक बोंदार्डे, संजय करंजकर, पद्मेश दुर्गे, प्रवीण पंचभाई, अमोल चौधरी, मिलद पोकळे, किरण महाजन, विशाल महाजन, बाहुबली महाजन, प्रतीक चवरकर, अक्षय महाजन, अमोल पंचभाई, सुलभा झरकर, मुंगल महाजन, मंजुषा चवरकर, शलाखा महाजन, सपना पोकळे, मीना बोंदार्डे, विमल पोकळे, अंजली पंचभाई, रजनी महाजन, सुचिता करंजकर यांच्यासह जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री शिवलिंगेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्री शिवलिंगेश्वर मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह २३ ते ३० मार्च दरम्यान उत्साहात संपन्न झाला. शेवटच्या दिवशी सद्गुरू युवा संत शिवाचार्य महाराज बापू यांच्या कीर्तन, शिवपार्वती विवाह सोहळा व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता करण्यात आली. यावेळी महिला भाविक-भक्तांनी चांगलीच गर्दी केली होती.



प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या प्रेरणेने अखंड शिवनाम सप्ताह सोमवार, दिनांक २३ मार्च ते सोमवार ३० मार्च दरम्यान आयोजित करण्यात आला होता. या शिवनाम सप्ताहात श्री गुरु १०८ ष.ब्र. डॉ. नंदीकेश्वर शिवाचार्य महाराज, लासीन मठ, पूर्णा (ज.), श्री गुरु १०८ ष.ब्र. युवासंत वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज, थोरला मठ, वसमत, श्री गुरु राजशेखर शिवलिंग शिवाचार्य महाराज, वीरभठ राजूर, अहमदपूर, आचार्य गुरुराज स्वामी आदींनी प्रबोधनात्मक विचार मांडले.

भक्तीस्थळ अहमदपूर- सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ५ ते ६ शिवपाठ, सकाळी ६ ते ७ अन्नदात्यांकडून शिवलिंगेश्वरास रुद्राभिषेक, ८ ते ११ परमरहस्य ग्रंथाचे सामुदायीक पारायण, ११ ते १२ प्रवचन, दुपारी मन्मथ गाथा भजन, सायंकाळी शिवपाठ, रात्री शिवकीर्तन, शिव जागर व सप्ताहामध्ये कीर्तनकार शि.भ.प. सौ. उज्ज्वलाताई राजेवार, प्रवचनकार शि.भ.प. सौ. संगिताताई कहाळेकर, शि.म.प. श्रीराम महाराज देशमुख, प्रवचनकार शि.भ.प. हरीभाऊ नेरनाळे, कीर्तनकार शि.म.प. विश्वनाथस्वामी पेनूरकर व प्रवचनकार शि.भ.प. सुरेखाताई भगनावराव किडे , शि.भ.प.लक्ष्मण अप्पा विभुते, शिवकुमार काशेटे, शि.भ.प. अन्नाराव होनराव गुरूजी, सौ. संगिता कारलेकर, शि.भ.प. मन्मथअप्पा डांगे, वैष्णवीताई गौड पानभोसी तर प्रा. चंद्रशेखर शिराळे यांचे प्रवचन झाले.

या सप्ताहाला दैनंदिन अन्नदाते यांनी सहकार्य केले तर भाविक, भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखंड सप्ताह यशस्वीतेसाठी शिवभक्त सेवा मंडळ, अखंड शिवनाम सप्ताह समिती व समस्त समाज बांधव सिडको-हडको नवीन नांदेड यांनी परिश्रम घेतले.

फॅशन|संसार|सौंदर्य
# सखी

# ऊन लागले तापू, केसांसाठी खास टिप्स जाणून घेऊ...

**उन्हाळा म्हणजे त्वचेची जास्त काळजी आणि त्याचबरोबर केसांचीही जास्त काळजी आणि निगा राखणं आलंच. आपले केस हे आपल्या व्यक्तिमत्वाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. अगदी लांबसडक नसले तरी मऊ मुलायम आणि चमकदार केस हे चांगल्या आरोग्याचे लक्षण  नक्कीच आहेत. पण अनेकदा दुर्लक्षामुळे केस खराब होतात.धूळ, प्रदूषण आणि त्यात उन्हाळ्यात येणाऱ्या घामामुळे केस निस्तेज आणि रुक्ष होतात. साहजिकच उन्हाळ्यात केसांची देखभाल करण्याची जास्त गरज असते. उन्हाळ्यात केसांची निगा कशी राखावी यासाठी काही खास टीप्स...**



» केस स्वच्छ ठेवा : उन्हाळ्यात घाम भरपूर येतो. त्याचबरोबर कोरडी हवा, धूळ, प्रदूषण यामुळे केस खूप घाण होतात. त्यामुळे उन्हाळ्यात केस स्वच्छ ठेवणं जास्त आवश्यक आहे. नियमित वर्कआऊट, व्यायाम करणाऱ्यांनी रोज केस धुतले पाहिजेत. केस धुतल्यानंतर ते ओलसर राहू न देता पूर्ण कोरडे करा. मोठे केस असतील तर एक दिवसाआड केस धुवावेत. मात्र रोजच्या रोज हार्ड शॅम्पूने केस धुणे टाळावे.

» केस धुण्याआधी तेल लावा : उन्हाळ्यात केस अगदी कोरडे, निस्तेज होतात. केस मऊ आणि हायड्रेट होण्यासाठी खोबऱ्याचं तेल सर्वोत्तम आहे. वर्षानुवर्षे आपल्याकडे केसांना खोबरेल तेल लावण्याची पध्दत आहे. तेल थोडेसे कोमट करुन लावल्यास त्याने अधिक फायदा होतो. नियमित तेल लावल्याने केसांना उत्तम पोषण मिळतेच. पण उन्हाळ्यात खोबरेल तेल लावल्याने केसांचा रुक्षपणा कमी होतो. तुम्ही केस धुण्याआधी एक तास खोबरेल तेल लावू शकता. रात्री झोपण्याआधी तेल लावून रात्रभर तसंच ठेवल्यास त्याचा चांगला परिणाम होतो. यामुळे केस अधिक मजबूत आणि दाट तसेच निरोगी बनतात.

» चांगला शॅम्पू आणि कंडिशनरचा वापर करा : उन्हाळा असो की हिवाळा, कोणताही ऋतू असला तरी केसांसाठी नेहमी चांगल्याच प्रतीचाच शॅम्पू आणि कंडिशनर वापरा. स्वस्त किंवा जाहिरातीत पाहून शॅम्पूची निवड करू नका. तुमच्या केसांसाठी योग्य असेल तोच शॅम्पू आणि कंडिशनर वापरा. केमिकलयुक्त शॅम्पूमुळे केस आणि त्याचबरोबर स्कॅल्पही कोरडा, रुक्ष होतो, त्यामुळे शक्यतो केमिकलमुक्त शॅम्पूच वापरावा. नैसर्गिक किंवा ऑर्गेनिक शॅम्पूचा वापर करणे योग्य.

» बाहेर जाताना केसांना रुमाल बांधा : उन्हाळ्यात कडक उन्हामुळे केस खराब होऊ शकतात. त्यामध्ये रुक्षता, रखरखीतपणा येतो. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत अगदी सकाळी घराबाहेर पडणार असाल तरी डोक्याला स्कार्फ किंवा टोपी अवश्य घाला. हा रुमाल किंवा स्कार्फ कॉटनचाच वापरावा, कारण त्यामुळे डोक्याला थंडावा मिळतो आणि ऊन्हापासूनही संरक्षण होते. उन्हापासून केसांचं संरक्षण करण्यासाठी यूव्ही फिल्टर स्प्रे, जेल किंवा क्रिमचाही वापर करु शकता. यामुळे उन्हापासून केसांचा बचाव होईल.

» केसांसाठी योग्य डाएट : केस फक्त बाहेरुनच नाही तर आतूनही निरोगी असायला हवेत. त्यासाठी योग्य ते डाएट असणं गरजेचं आहे. मजबूत, दाट केसांसाठी आहारात प्रोटिन्स, व्हिटॅमिन्सचे योग्य प्रमाण असले पाहिजे. हिरव्या भाज्या, सोयाबीन, रताळे आणि ड्रायफ्रूट्सचा समावेश अवश्य आपल्या डाएटमध्ये करा. यामध्ये आयर्न, बीटा-कॅरोटीन, व्हिटॅमिन-ए आणि ओमेगा-३ असतं, ज्याचा केसांना खूप फायदा होतो. जास्त तेलकट, मसालेदार, जंक फूड खाण्याने केसांवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे चौरस आणि योग्य आहार घेणं गरजेचं आहे. त्याचप्रमाणे उन्हाळ्यात मिळणारी फळे, भाज्या भरपूर खा. काकडी, खरबूज, कलिंगड, आंबा, संत्री यांचं शक्य तितक्या जास्त सेवन करा. तसेच शहाळे,  कोकम सरबत, लिंबू सरबत अशी सरबतेही अवश्य घ्या. भरपूर पाणी मात्र नक्की प्या.

» केसांवर हॉट टूल्स वापरणं टाळा : अनेक जणींना केसांसाठी हेअर स्ट्रेटनर, ड्रायर वापरण्याची सवय असते किंवा त्यांच्या व्यवसायाचा भाग म्हणून ते वापरावं लागतं. पण अशा हॉट टूल्समुळे केस तुटतात, केसांचं अतोनात नुकसान होतं. केस अगदी निस्तेज आणि रुक्ष दिसू लागतात. त्यामुळे शक्यतो या हॉट टूल्सचा वापर करु नये. अगदी करावाच लागला तर रात्री झोपताना केसांना तेलाने मसाज करावा. केसांची वेणी घालून रात्रभर तशीच ठेवावी. सकाळी उठल्यावर केस चांगल्या शॅम्पूने स्वच्छ धुऊन टाकावेत.

» केसांना दर ३ महिन्यांमध्ये ट्रिम करा : दर तीन महिन्यांनी केस ट्रिम केल्यास केस अधिक चांगले वाढतात व दाट होतात. त्यामुळे केसांना स्प्लिट एंड्स होत नाहीत आणि केस दाट दिसतात. उन्हाळ्यात केस जास्त वेगाने वाढतात. रेग्युलर ट्रिमिंग केल्याने केसांचे आरोग्य चांगले राहते आणि व्हॉल्यूमही वाढतो.

### कोरफड जेलचा वापर...

कोरफड त्वचेसाठी अत्यंत गुणकारी असते तशीच केसांसाठीही चांगली आहे. उन्हाळ्यात कोरफड लावल्यास थंडावा मिळतो. केसांना कोरफड जेल लावल्यास थंडावा तर मिळतोच पण केस चमकदार, मऊ होण्यासही मदत होते. केस धुण्याआधी अर्धा तास केसांना कोरफड लावून ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने केस धुऊन टाका. कोरफड जेल खोबरेल तेलात मिक्स करुन हेअर मास्क तयार करा. हा मास्क केसांना लावल्यास केस चमकदार होतात. केसांची नियमित निगा राखणे, तेलाचा मसाज, केसांची स्वच्छता या अगदी मुलभूत गोष्टी आहेत. या गोष्टी नियमितपणे केल्यास कोणत्याही अन्य हेअर ट्रीटमेंटची गरजच भासणार नाही आणि उन्हाळ्यातही केसही सुंदर, मुलायम, चमकदार दिसतील.

# लग्नात वेगळं दिसण्यासाठी...



**लग्न असो अथवा कोणताही समारंभ, आपण स्टायलिश दिसण्यासाठी नक्कीच प्रयत्न करत असतो. मग ते कपडे असोत अथवा दागिन्यांची विविध फॅशन. सध्या ट्रेंडमध्ये नक्की काय चालू आहे याचा विचार करूनच आपण लग्नसमारंभात अथवा अन्य कार्यक्रमांना नटूनथटून, पेहराव करून जातो. लग्न म्हटलं की काही रंग डोक्यात अगदी फिक्स असतात. पण सध्या लग्नाच्या सीझनमध्ये वेगळं दिसण्यासाठी गडद रंगांची गरज भासत नाही. कारण सध्या ट्रेंडिंगमध्ये आहे ते म्हणजे पेस्टल कलर. लेटेस्ट ट्रेंडमध्ये पेस्टल रंगाची साडी, लेहंगा अथवा शराराची तुम्ही स्टाईल करून अधिक आकर्षक आणि वेगळे नक्कीच दिसू शकता. यासाठी काही युनिक आणि ट्रेंडिंग डिझाईन्सचा वापर करा आणि आम्ही दिलेल्या टिप्सचादेखील...**

### पीच पेस्टल साडी



साडी हा असा पेहराव आहे की, कोणत्याही समारंभामध्ये उठावदारच दिसतो. पण त्यातही लग्नामध्ये साडी नेसण्याचा ट्रेंड हा कधीही जुना होत नाही. पेस्टल रंगांमध्ये पीच पेस्टल साडी ही लग्नामध्ये तुम्ही नेसली तर ती अधिक आकर्षक आणि लक्षवेधी ठरते. पेस्टल रंगाची सिक्विन साडी असो अथवा चिकनकारी साडी असो तुम्ही ही स्टाईल नक्की ट्राय करू शकता. बाजारामध्ये साधारणतः २००० ते ३००० च्या किमतीत ही साडी तुम्हाला आरामात मिळते. त्यावर त्याला साजेसे दागिने घालून तुम्ही तुमचा लुक पूर्ण करू शकता. आता या साडीसह नक्की काय घालावे असा प्रश्न जर तुम्हाला मनात येत असेल तर या साडीसह तुम्ही मोत्यांचे दागिने घालून परफेक्ट लुक मिळवा. तसंच या स्टाईलची आणि पेस्टल रंगांची साडी प्लस साईज बॉडी टाईफ असल्यास अत्यंत सुंदर दिसते. त्यामुळे लग्नामध्ये एकदा या रंगाच्या साडीची फॅशन नक्की करून पाहा.

### ग्रीन पेस्टल लेहंगा

लेहंगा ट्रेंडही सध्या खूपच मुलींना आवडत आहे. ज्या मुलींना साडी सांभाळता येत नाही, त्यांच्यासाठी हा उत्तम पर्याय ठरतो. ग्रीन पेस्टल अथवा याच रंगांशी मिळताजुळता पेस्टल रंग तुम्ही लग्नासाठी लेहंगा घेताना निवडू शकता. साधारणतः ३००० ते ५००० च्या दरम्यान किमतीमध्ये लग्नासाठी बाजारात पेस्टल रंगाचा लेहंगा तुम्हाला मिळू शकतो. तुमचा खांदा ब्रॉड अर्थात थोडा मोठा असेल तर तुम्ही या लेहंग्यासह कुंदनचे दागिने घालू शकता. तसंच या पेहरावासह तुम्ही ग्लॉसी बेस मेकअप अथवा ओठांसाठी केवळ लिपग्लॉसचा वापर केल्यास, तुमचा लुक अधिक खास होतो. यावर भडक पद्धतीचा मेकअप न करता पेस्टल रंगांशी मिळताजुळता मेकअप करावा जेणेकरून तुमच्याकडे अधिक लोकांचे लक्ष जाईल.

### पेस्टल पिंक शरारा

शरारा अथवा घरारादेखील सध्या ट्रेंडमध्ये आहे. ज्यांना साडी नेसायला आवडत नाही अथवा लेहंग्यामध्ये पाय अडकण्याची शक्यता वाटते त्यांनी या स्टाईलचा पर्याय निवडावा. साधारणतः १५ ते २५ वयोगटातील मुलींना ही स्टाईल शोभून दिसते. नेट फॅब्रिकने तयार करण्यात आलेला असा पेस्टल पिंक शरारा लग्नामध्ये नक्कीच आकर्षक दिसतो. तसंच पेस्टल पिंक रंग हा कोणत्याही स्किन टोनवर उठावदार दिसतो. २००० ते ३००० च्या किमतीत हा शरारा सेट तुम्ही विकत घेऊ शकता. अशा पेस्टल पिंक शरारासह तुम्ही हेव्ही इअररिंग्ज मॅच करून घालावे. तुमच्याकडे जरकन स्टोनवर्कचे कानातले असतील तर अधिक सुंदर दिसतील. याशिवाय हलकीशी हेअरस्टाईल केल्यासदेखील तुमच्या लुकला परफेक्शन मिळते. यासाठी सहसा ओपन हेअर स्टाईलची तुम्ही निवड करा. असं केल्यामुळे तुमच्या सौंदर्याला एक वेगळाज साज मिळेल यात शंका नाही.

### पेस्टल रंगांची कशी कराल स्टाईल...

- प्रोफेशनल थीमसाठी तुम्ही पेस्टल रंगांसह लाल आणि निळ्या रंगाचे कॉम्बिनेशन ट्राय करा.
- गडद रंगासाठी अर्दी कलर थीम तुम्ही वापरू शकता, जिथे तुम्हाला अधिक कॉन्ट्रास्ट रंगसंगती करावी लागते. उदाहरणार्थ - प्लम आणि रेडीश ऑरेंज अशा रंगाचे कॉम्बिनेशन कपडे तुम्ही वापरू शकता.
- क्रिस्प आणि ड्रामेटिक कलर स्किमसाठी तुम्ही राखाडी टोन्ससह खाली ब्राईट कूलर ग्रीन शेड वापरा. कूलर ब्लू हा रंग अधिक आकर्षक दिसतो. तसंच पाण्याचा निळा रंगही पेस्टलमध्ये अधिक उठावदार दिसतो.
- नैसर्गिक ब्राऊन आणि लाईट हिरव्या रंगामध्येही तुम्ही साडी वा शरारा ट्राय करू शकता.
- आईस ब्लू या रंगासह राखाडी रंग हा अत्यंत रिफ्रेशिंग आणि डोळ्यांना सुखद वाटतो.
- बबलगम गुलाबी अर्थात बबलगम पिंक आणि टरकॉईज ह्यूज या रंगाचे कॉम्बिनेशन तुमचा मूड ताजातवाना ठेवायला अत्यंत उपयोगी ठरतो.
- तुम्हाला जर लेटेस्ट आऊटफिट, रंग आणि स्टाईल याविषयी जाण असेल तर तुम्ही त्या पद्धतीने आपली स्टाईल मॅच करून घ्या. पण लग्नासाठी तुम्ही सध्या ट्रेंडिंग असणारे असे रंग नक्की एकदा ट्राय करून पाहा.

# सनस्क्रिनचा टाळा अतिवापर !



**खरं तर सनस्क्रिन (sunscreen) लावण्याचा सल्ला प्रत्येक ऋतूमध्ये देण्यात येतो. पण उन्हाळ्याच्या दिवसात तर याचा आवर्जून वापर करायला हवा. आपण नेहमीच सनस्क्रिनचा वापर आणि त्यामुळे होणारे फायदे वाचत आलो आहेत. सूर्याच्या हानिकारक किरणांपासून आपल्या त्वचेला संरक्षण देण्यासाठी नक्की याचा उपयोग होतो. इतकंच नाही तर त्वचेवर येणारे काळे डाग, पिगमेंटेशन आणि स्किन टोन खराब झाल्यास त्यापासूनही सनस्क्रिनमुळे संरक्षण मिळते. पण जर सनस्क्रिनचा अधिक वापर केला आणि त्याचा योग्य वापर झाला नाही तर नक्की काय होते याबाबतही तुम्हाला माहिती असण्याची गरज आहे. सनस्क्रिनमुळे नक्की काय नुकसान होऊ शकतात हे आपण जाणून घेऊया...**

» संवेदनशील त्वचेला त्रासदायक : तसं तर सनस्क्रिनचा वापर हा प्रत्येक महिलेने करायला हवा. जेणेकरून त्वचेची योग्य काळजी घेता येईल. पण तुमची त्वचा जर संवेदनशील असेल तर तुम्हाला कोणते सनस्क्रिन वापरत आहात याची योग्य पद्धतीने खात्री करून घेता यायला हवी. सनस्क्रिनमधील घटक हे संवेदनशील त्वचेवर (sensitive skin) नेहमी त्रासदायक ठरतात. त्वचेला कोरडेपणा, खाज आणि सूज तसंच जळजळ निर्माण करण्यासारख्या समस्या यामुळे निर्माण होतात. कसे वाचाल : सनस्क्रिन खरेदी करण्यापूर्वी नेहमी पॅच टेस्ट करून घ्या. विशेषतः तुमची त्वचा संवेदनशील असेल तर तुम्ही हा मार्ग स्वीकारायला हवा. जर सनस्क्रिन तुमच्या त्वचेला त्रासदायक ठरत असेल तर लगेच चेहरा धुवा.

» त्वचेवर ॲलर्जीक रिॲक्शन : सनस्क्रिनमध्ये अनेक तऱ्हेच्या केमिकल्सचा वापर करण्यात येतो. यामुळे तुमच्या त्वचेवर ॲलर्जी निर्माण होते. लालपणा, खाज, सूज आणि चेहऱ्यावर चट्टे येणे या गोष्टी संकेत देतात की तुमच्या सनस्क्रिनमुळे तुम्हाला ॲलर्जी येत आहे. तसंच यामुळे तुमची त्वचा अधिक संवेदनशील होते. काही सनस्क्रिनमध्ये वापरण्यात येणाऱ्या PABA अर्थात पॅरा अमिनो बेंजॉईक ॲसिडमुळे तुम्हाला ही ॲलर्जी येऊ शकते. त्यामुळे सनस्क्रिनचा वापर करताना हा योग्य प्रमाणात करायला हवा. कसे वाचाल : सनस्क्रिन घेताना त्यामध्ये कोणते घटक आहेत याची शहानिशा करून घ्यावे. तसंच हायपोलेर्गेनिक लेबल असणारे सनस्क्रिन तुम्ही खरेदी करा. याशिवाय तुम्ही 24 तासांची एक पॅच टेस्टही करून पाहू शकता. यामुळे सनस्क्रिनचा तुमच्या त्वचेवर कोणताही वाईट परिणाम होत नाहीये हे तुम्हाला कळेल आणि वापरणं सहज शक्य होईल.

» डोळ्यांमध्ये जळजळ : सनस्क्रिनच्या अतिवापरामुळे डोळ्यांनाही त्रास होतो. डोळे हा अत्यंत कोमल भाग आहे. सनस्क्रिन चुकूनही डोळ्याच्या आत गेलं तरीही डोळ्यांची जळजळ होऊन तुम्हाला डोळ्यांचा त्रास सुरू होऊ शकतो. तसंच यामुळे डोळ्यांची संवेदनशीलता कमी होऊ शकते. त्यामुळे याचा वापर अति करू नका. कसे वाचाल : चेहऱ्यावर सनस्क्रिन लावताना आपल्या डोळ्यांच्या खाली अथवा डोळ्यांच्या आजूबाजूला लावू नका. या गोष्टीची काळजी घेणे गरजेचे आहे.

» ॲक्नेची समस्या : तुम्हाला जर ॲक्नेची समस्या (acne problem) असेल तर सनस्क्रिन लावल्यानंतर तुमच्या त्वचेची ही समस्या अधिक वाढीला लागते. जर तुम्ही ऑईल बेस्ड सनस्क्रिनचा (oil based sunscreen) वापर करत असाल तर ही समस्या अधिक वाढते. सनस्क्रिनमध्ये असणारे केमिकल्स तुमच्या त्वचेला हानिकारक ठरू शकतात आणि ॲक्नेशिवाय लालपणा, खाज आणि सूज येण्यासही कारणीभूत ठरू शकते. कसे वाचाल : साधारणतः ॲक्नेची समस्या वाढण्याचे कारणच सनस्क्रिन ठरू शकते. त्यामुळे तुम्ही अशा सनस्क्रिनचा वापर करा जे तुमच्या त्वचेच्या टाईपला योग्य ठरते. नॉन ग्रीसी आणि नॉन कॉमेडोजेनिक सनस्क्रिन हे तुमच्या त्वचेसाठी जास्त फायदेशीर ठरू शकते. याशिवाय तुमच्या चेहऱ्यावर वापरण्यात येणारे सनस्क्रिन हे शरीरासाठी असणाऱ्या सनस्क्रिनपेक्षा वेगळे असते हे लक्षात घ्या.

# व्हाईट अन् आयव्हरी रंगाच्या साडीची फॅशन

**व्हाईट रंगामध्येही शेड्स असतात हे तुम्हाला माहीत आहे का? हे वाचून तुम्हाला नक्कीच आश्चर्य वाटलं असेल. ऑफव्हाईट, चॉकव्हाईट अथवा आयव्हरी असा कोणताही रंग सध्या अधिक ट्रेंडमध्ये दिसून येतोय. खरं तर हे रंग वेस्टर्न कपड्यांपेक्षा साडी आणि इंडियन वेअरमध्ये अधिक दिसून येतात. काही वर्षांपूर्वी सफेद अथवा व्हाईट रंग घालणे चांगले मानले जात नसे. पण आता ही गोष्ट फारच जुनी झाली आहे आणि फॅशन स्वरूपात आणि फॅशन जगतात आता व्हाईट रंग अधिक चांगल्या पद्धतीने स्वीकारला जात आहे. हा हॉट ट्रेंड तुम्हालाही ट्राय करायचा असेल तर तुम्ही ही स्टाईल कॅरी करण्यासाठी कोणत्या टिप्स वापरायला हव्यात हे जाणून घ्या आणि दिसा अधिक आकर्षक!**



- मोनोटोन मॅजिक : व्हाईट अथवा आयवरी साडीची स्टाईल करण्यासाठी सर्वात सोपी, बेसिक आणि फुलप्रूफ पद्धत म्हणजे मोनोटोन अर्थात पूर्ण लुक एकाच रंगात करणे. डोक्यापासून पायापर्यंत एकसमान रंग ठेवणे. पांढऱ्या अथवा ऑफव्हाईट रंगाची साडी जर तुम्ही स्टाईल करणार असाल आणि ही साडी एम्ब्रॉईडेड असेल तर तुम्ही त्यासह एक व्हाईट थ्री क्वार्टर स्लीव्ह्ज ब्लाऊज घालावा. तसंच यावर दागिने अगदी भरभरून न घालता केवळ चांदीचे कानातले घालावेत. जेणेकरून साडीवर लक्ष हटणार नाही आणि तुमचा लुक अधिक उठावदार दिसून येईल. अशी साडी असेल तर गळ्यात भरजरी दागिने घालू नका आणि मोठे कानातले घाला.
- सिक्वेन व्हाईट साडीसह लुक : ऑल व्हाईट आयव्हरी लुक थोडा कंटाळवाटा दिसू शकतो असं जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही सिक्वेन साडीची निवड करा. होलग्राफिक सिक्विन वर्कच्या साडीमुळे एक वेगळा आणि इंटरेस्टिंग लुक निर्माण होतो. तुम्हाला जर यासह मिसमॅच करायचे असेल तर तीदेखील तुमची आवड आहे. मात्र याचाही लुक तुम्ही मोनोटोन ठेवलात तर अधिक सुंदर दिसेल. सिक्विन साडी असेल तर तुम्हाला अधिक ग्लॅमरस आणि लक्षवेधी लुक मिळतो आणि सर्वांच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतात.
- स्टेटमेंट ब्लाऊज : साडी अगदी साधी असेल तर त्यासाठी तुम्ही स्टेटमेंट ब्लाऊजचा वापर करू शकता. स्टेटमेंट म्हणजे अशा सफेद साडीसह तुम्ही मल्टीकलर ब्लाऊज अथवा गडद रंगाचा भरजरी ब्लाऊज वापरलात तर अधिक सुंदर दिसेल. तुम्हीदेखील जर प्लेन व्हाईट वापरणार असाल तर तुमचा ब्लाऊज हा अप्रतिम असायला हवा. या साडीसह तुम्ही कमीत कमी प्लॅटिनम दागिन्यांचा वापर करावा. हातात ब्रेसलेट, मोठे कानातले अथवा कानातले नसल्यास नाजूक डिझाईनचा नेकलेस तुम्ही वापरल्यास, हा लुक अधिक उठावदार आणि आकर्षक दिसतो.
- कलर पॉप : ऑल व्हाईट लुक बरेचदा कंटाळवाणा वाटू शकतो. त्यामुळे हा लुक अधिक उत्तम आणि आकर्षक करण्यासाठी तुम्ही थोडा कलर पॉप करण्याची गरज आहे. पण बरेचदा पांढऱ्या रंगासह नक्की कोणता रंग वापरावा हे अनेकांना कळत नाही. तर चुकीचा रंग निवडल्यास, लुकही खराब होतो आणि पांढऱ्या साडीवरून नजर हटू शकते. त्यामुळे कोणतीही जोखीम न घेता मोनोटनी लुक ब्रेक करून गडद लिपस्टिकचा वापर करू शकता. ही लिपस्टिक तुम्हाला वेगळाच लुक मिळवून देते.

# साकळाई योजनेला १,२३४ कोटी, दिव्यांगांच्या शिष्यवृत्तीत मोठी वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील पाणी, पर्यावरण, शिक्षण आणि प्रशासनाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. अहिल्यानगरमधील साकळाई सिंचन योजनेसाठी १२३४ कोटींची मंजुरी, ५४ प्रदूषित नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र प्राधिकरण, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ असे महत्त्वाचे निर्णय या बैठकीत घेण्यात आले. याशिवाय आरक्षण उपवर्गीकरणावर समिती, अमरावतीत क्रीडा संकुलासाठी जमीन आणि भूमि अभिलेख विभागातील प्रशासकीय बदलांनाही मंजुरी देण्यात आली.




अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा आणि नगर तालुक्यातील ३२ गावांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १,२३४ कोटी १३ लाख रुपयांच्या तरतुदीला मंजुरी मिळाली. घोड धरणातून १.८० टीएमसी पाणी उचलून ९,६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. राज्यातील ५४ प्रदूषित नदी पट्ट्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. याचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील. मिठी, मुळा-मुठा, भीमा आणि पंचगंगा यांसारख्या नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी २,००० कोटींचा निधी उभारण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

शिशुवर्ग ते बारावीपर्यंतच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत भरीव वाढ करण्यात आली आहे. आता शिशुवर्ग ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये, तर ११ वी-१२ वीच्या निवासी विद्यार्थ्यांना १,००० रुपये शिष्यवृत्ती मिळेल. यापूर्वी ही रक्कम केवळ १०० ते २०० रुपयांच्या दरम्यान होती. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाबाबत प्राप्त निवेदने आणि अर्जांचा विचार करण्यासाठी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती एका महिन्यात आपला अहवाल मंत्रिमंडळाला सादर करेल. भूमि अभिलेख विभागातील 'भूकरमापक' हे पद रद्द करून आता 'परिरक्षण भूमापक' हे नवीन पद निर्माण करण्यात आले आहे. या विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार एकूण १०,६८३ पदांना मंजुरी देण्यात आली असून, कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतही सुधारणा होणार आहे. अमरावती येथील मौजे नवसारी येथील १६,७०८ चौ.मी. जमीन अमरावती महानगरपालिकेला क्रीडा संकुलासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या जमिनीवरील जुने वाणिज्य वापर शुल्कही माफ करण्यात आले असून, यामुळे शहरात क्रीडा सुविधांचा विकास होणार आहे.

## गडचिरोलीत ९ जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण

**गडचिरोली (प्रतिनिधी)** – गडचिरोली पोलीस दल आणि उठझऋ च्या संयुक्त मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. मंगळवार ३१ मार्च रोजी ९ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. यामध्ये ३ वरिष्ठ एसीएम स्तरावरील माओवाद्यांचा समावेश असून, या सर्वांवर मिळून ३० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते.

या कारवाईत विशेष बाब म्हणजे दोन महिला माओवाद्यांनी अत्याधुनिक शस्त्रांसह शरणागती पत्करली. शांती वंजा वड्डे हिने एके-४७ रायफल आणि ३० जिवंत काडतुसांसह आत्मसमर्पण केले, तर सुक्की बामी कुंजाम हिने कार्बाईन रायफलसह हिंसेचा मार्ग सोडला. आत्मसमर्पणानंतर मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेजवळील कुमनार व गुंडापुरी जंगल परिसरात पोलिसांनी मोठी कारवाई करत शस्त्रसाठा जप्त केला. यात एसएलआर रायफल, वॉकीटॉकी, डेटोनेटर आणि पेनड्राइव्ह यांचा समावेश आहे.

## कोठडीतल्या महिलेकडे शरीरसुखाची मागणी करणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल

**अकोला (प्रतिनिधी)** – 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे महाराष्ट्राच्या पोलिसांचे ब्रीदवाक्य, ज्याचा आदर संपूर्ण महाराष्ट्राला आहे. पण हेच रक्षक आता भक्षक बनले आहेत, असं म्हटलं तरी त्यात काही चुकीचं ठरणार नाही. कारण अकोल्यात घडलेल्या संतापजनक प्रकाराने पोलीस खरंच आपले रक्षणकर्ता आहेत की नाही? हा प्रश्न उपस्थित होतो आहे. जी वर्दी संपूर्ण महाराष्ट्रातील स्त्रियांचं रक्षण करण्यासाठी कायम सक्षम आणि पुढे असते, त्याच वर्दीला अकोल्यातील प्रकाराने काळे डाग लागले आहेत.

एका महिलेला ८० लाख रुपयांच्या फसवणुकीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. सायबर पोलिसांनी बेड्या ठोकल्यानंतर न्यायालयाने तिला पोलीस कोठडी सुनावली. अकोल्यातील सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या कोठडीत ही महिला कैद आहे. तिथेच आपलं कर्तव्य बजावत असलेल्या राजेश जाधव यांनी मर्यादेचे उल्लंघन करत संबंधित महिलेकडे शरीर सुखाची मागणी केली. तू खूप सुंदर दिसतेस, तुझी मुलगीही अगदी तुझ्यासारखी सुंदर आहे. तिला माझ्याकडे पाठव त्या बदल्यात मी तुला १०,००० देतो, असे सांगितले. एका पोलिसाची ही मागणी ऐकताच महिलेला धक्का बसला, महिलेने घाबरून न जात हा सर्व प्रकार उपस्थित असलेल्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्याला सांगितला.




पोलीस महिला कर्मचारी हिने तात्काळ हा प्रसंग वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कळवला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात येताच संताप व्यक्त करत, वर्दीची लाज राखा असे कडक शब्दात सुनावले आणि आरोपी पोलीस उपनिरीक्षक राजेश जाधव यावर तात्काळ निलंबनाची कारवाई केली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहेत. पीडित महिलेच्या फिर्यादीवरून राजेश जाधव विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला तातडीने निलंबित करण्यात आले आहे. सुदर्शन पाटील यांनी या प्रकरणाला गांभीर्याने घेत कडक कारवाईचे संकेत दिले आहेत. घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला, आणि संपूर्ण महाराष्ट्र भरातून पोलीस अधिकाऱ्यावर कडक शिक्षेची मागणी करण्यात आली आहे. तसेच सामाजिक क्षेत्रातून या घटनेचा निषेध व्यक्त होत आहे.

## 'आरटीई' अंतर्गत दोन लाख ८८ हजार अर्ज

**मुंबई (प्रतिनिधी)** – शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी राज्यातील दोन लाख ८८ हजारांहून अधिक बालकांचे अर्ज आले आहेत. या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत अर्ज करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे प्राथमिक शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

प्रवेशासाठी ऑनलाइन सोडत आणि प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल, असेही शिक्षण विभागाने नमूद केले आहे. प्राथमिक शिक्षण विभागातर्फे खासगी शाळांमधील आरटीई २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी केंद्रीय पद्धतीने ऑनलाइन प्रक्रिया राबविली जाते. यंदा राज्यातील आठ हजार ७०१ शाळांमध्ये एक लाख १४ हजार ८३३ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. आरटीई प्रवेशासाठी विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून एक किलोमीटर परिसरातील शाळा निवडण्याचे शिक्षण विभागाने घातलेले बंधन उच्च न्यायालयाने रद्द केले. त्यानंतर शिक्षण विभागाने एक किलोमीटरची मर्यादा काढून अर्ज भरण्यासाठी पालकांना संधी उपलब्ध करून दिली होती.

## आर्थिक वर्षाच्या अखेरीस मंत्रालयात 'जीआर'चा पाऊस

**मुंबई (प्रतिनिधी)** – आर्थिक वर्षाच्या अखेरीस मंत्रालयात 'जीआर'चा पाऊस पडताना दिसला. गेल्या चार दिवसांत मंत्रालयातील विविध विभागांनी तब्बल ९५१ शासन निर्णय (जीआर) निर्गमित करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला. विशेष म्हणजे, शनिवार-रविवार आणि महावीर जयंतीची सार्वजनिक सुट्टी असतानाही प्रशासन पूर्णवेळ कार्यरत होते.

३१ मार्च रोजी संपणाऱ्या २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा निधी व्यपगत (लॅप्स) होऊ नये, यासाठी प्रस्तावांवर मान्यतेची मोहोर उठवण्याचा सपाटा मंत्रालयात पाहायला मिळाला. सुट्टीच्या दिवशी, मंगळवारी एका दिवसात २६७ जीआर प्रसिद्ध करण्यात आले. या काळात मंत्री, त्यांचे खासगी सचिव, विविध विभागांचे सचिव आणि कर्मचारी मंत्रालयात तळ ठोकून होते. १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या नवीन आर्थिक वर्षापूर्वी प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी ही प्रशासकीय तत्परता दाखवण्यात आली.

मार्चच्या शेवटच्या आठवड्यात शनिवार, रविवार आणि मंगळवार अशा तीन सुट्ट्या आल्या होत्या. केवळ सोमवार हा कामकाजाचा दिवस होता. मात्र, 'मार्च एंड'चे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सर्वच विभागात कर्मचारी हजर होते. अनेक विभागांमध्ये रात्री उशिरापर्यंत शासन निर्णय पोर्टलवर अपलोड करण्याचे काम सुरू होते. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग – १२२ – दिव्यांग कल्याण विभाग – १०० – शालेय शिक्षण विभाग – ८५ – मृद व जलसंधारण विभाग – ६५ – महसूल व वन विभाग – ६४ – उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग – ६१ – सहकार व वस्त्रोद्योग विभाग – ५३ – गृह विभाग – ४१ – कृषी विभाग – ३५ – सार्वजनिक आरोग्य विभाग – ३५ – अल्पसंख्याक विकास विभाग – १४

सरकारी नियमांनुसार, मंजूर झालेला निधी ३१ मार्चच्या रात्री १२ वाजेपर्यंत खर्च न झाल्यास तो पुन्हा सरकारी तिजोरीत जमा होतो. अनेक विकासकामे, योजनांचे अनुदान आणि कंत्राटदारांची देयके अदा करण्यासाठी शासन निर्णय काढणे अनिवार्य असते. हा निधी वाचवण्यासाठी आणि नवीन वर्षात कामांना गती देण्यासाठी ही कार्यवाही करण्यात आली.

## 'एलपीजी' व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरात मोठी वाढ



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – जागतिक तेलाच्या वाढत्या किमती आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, बुधवारी (१ एप्रिल, २०२६) व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात वाढ करण्यात आली. १९-किलोग्रामच्या सिलिंडरच्या दरात अंदाजे २१८ रुपयाने वाढ झाली आहे. नवीन दर लागू झाल्यामुळे, देशभरातील प्रमुख शहरांमधील गॅसचे नवीन दरही कमी-अधिक प्रमाणात वाढीसह जाहीर करण्यात आले आहेत. दिल्लीमध्ये, १ एप्रिलपासून १९-किलोग्रामच्या व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरची किंमत आता २०७८.५० रुपये झाली आहे. यापूर्वी, याच सिलिंडरची किंमत १८८३ रुपये होती, म्हणजेच १९५.५० रुपयांची वाढ झाली होती. मात्र, ग्राहकांसाठी दिलासादायक बाब म्हणजे घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात सध्या तरी कोणताही बदल झालेला नाही.

मुंबईमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडरची किंमत आजपासून २०३१ रुपयांपर्यंत वाढली आहे, जी पूर्वी १८३५ रुपये होती. म्हणजेच यात १९६ रुपयांची वाढ झाली आहे. कोलकातामध्ये १९ किलोच्या सिलेंडरची किंमत आजपासून २२०८ रुपयांपर्यंत वाढली आहे, जो पूर्वी १९९० रुपयांना उपलब्ध होता. म्हणजेच येथे सिलेंडर २१८ रुपयांनी महाग झाला आहे.

## भूकरमापकांना आता वाढीव वेतनश्रेणीसह पदोन्नती

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील भूकरमापकांना आता वाढीव वेतनश्रेणीसह पदोन्नती मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षेत झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत यावर बुधवारी शिक्कामोर्तब करण्यात आले.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने भूमि अभिलेख विभागाच्या सुधारित आकृतीबंधाला मंजुरी दिली आहे. यामुळे विभागातील पदरचना आणि वेतनश्रेणीत मोठे बदल होणार आहेत. विभागाच्या नवीन आकृतीबंधानुसार एकूण १०,६८३ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये ९,६३८ नियमित पदे असून १०४५ पदे कंत्राटी पद्धतीने भरली जाणार आहेत. यामुळे विभागाच्या कामकाजात गती येणार असून जमिनीशी संबंधित प्रलंबित प्रकरणे मार्गी लागण्यास मदत होईल. भूकरमापक पदाचे शैक्षणिक स्वरूप आणि कामाची व्याप्ती लक्षात घेऊन त्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता भूकरमापकांना एस-६ ऐवजी एस-८ ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनात मोठी वाढ होणार आहे. पदोन्नतीसाठी नवीन संवर्गाची निर्मिती या सुधारित निर्णयानुसार, 'भूकरमापक' हा संवर्ग आता 'मृत संवर्ग' म्हणून घोषित करण्यात आला आहे. याचा अर्थ, भविष्यात या पदावर थेट भरती होणार नाही. त्याऐवजी 'परिरक्षण भूमापक' हे पद नियुक्तीचे प्रथम स्तर असेल. तसेच, कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी मिळावी यासाठी 'परिरक्षण भूमापक (निवड श्रेणी)' हा नवीन संवर्ग निर्माण करण्यात येणार आहे.

**Change In Name**

My Old Name is **MOHAMMED HAJI** which now I am changing as New Name **ABDUL HAADI SHAIKH.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address :- H.No. 4-5-264/1, Barkatpura, V.T.C. Kamareddy Telangana 503111 Mo.No. 9390365017

## गांदरबलमध्ये झालेल्या चकमकीत १ दहशतवादी ठार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – काश्मीरच्या गांदरबल जिल्ह्यातील अरहमा भागात मंगळवारी सुरू झालेली सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमधील चकमक बुधवारी दुसऱ्या दिवशीही सुरू राहिली. या कारवाईत आतापर्यंत एक दहशतवादी ठार झाला आहे. या परिसरात अजूनही एक-दोन दहशतवादी लपून बसल्याची भीती असल्याने सुरक्षा दलांनी नाकाबंदी अधिक कडक केली आहे.

भारतीय लष्कराने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, ३१ मार्चच्या रात्री अधूनमधून झालेल्या गोळीबाराच्या दरम्यान सुरक्षा दलांनी रणनीतिकदृष्ट्या आपल्या वेढ्याची पुनर्रचना केली. सुरक्षा दलांनी अचूक गोळीबार करून एका दहशतवाद्याला ठार केले. ही कारवाई भारतीय लष्कराची दुसरी आसाम रेजिमेंट, जम्मू आणि काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफ यांच्या संयुक्त विद्यमाने केली जात आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, काश्मीरचे पोलीस महानिरीक्षक (आयजीपी) स्वतः अरहमा येथील चकमकीच्या ठिकाणी पोहोचले असून, ते कारवाईवर लक्ष ठेवून आहेत. बुधवारी सकाळी पुन्हा गोळीबाराचा आवाज ऐकू आल्यानंतर परिसरात अतिरिक्त कुमक पाठवण्यात आली आहे. संपूर्ण परिसरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. अरहमा येथे मंगळवारी सुरू झालेली नाकाबंदी आणि शोध मोहीम बुधवारीही सुरू आहे.

## अनुदानित रासायनिक खतांचे वितरण आता 'फार्मर आयडी'वर होणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानित रासायनिक खतांच्या वितरणात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी आता 'फार्मर आयडी'चा वापर करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

केंद्रीय कृषी मंत्री शेतकरी कल्याण मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली फार्मर आयडीसह इतर विषयांवर ऑनलाईन बैठकीप्रसंगी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली. अग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडीचा वापर करून देशातील पहिला पायलट प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. या उपक्रमामुळे खतांचे वितरण अधिक नियोजनबद्ध, अचूक आणि पारदर्शक पद्धतीने होणार असून, शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ थेट आणि योग्य पद्धतीने मिळणार आहे. तसेच बनावट व्यवहारांना आळा बसून प्रणाली अधिक विश्वासार्ह होणार आहे, अशी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली. दरम्यान, या बैठकीत महाराष्ट्रात अग्रीस्टॅक योजनेअंतर्गत सर्वाधिक प्रमाणात फार्मर आयडी तयार करण्यात आल्याबद्दल केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे अभिनंदन केले. तसेच अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना केवळ चार दिवसांत सर्वाधिक निधीचे वितरण करण्यात आल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
क्षेत्रिय कार्यालय क्र.६(सिडको)

जा.क्र.नांवाशमनपा/क्षेकाक्र.६/नांपरि/२४८६/२०२५ दिनांक :०६/०३/२०२५

जहीर प्रगटन

संचिका क्र. ६४२/४०/क्षे.कां.क्र.६ (सिडको) २०२५-२०२६
प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.
या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की श्री./श्रीमती दिगांबर विठ्ठलराव कदमभोड
मौजे कौठा रा. कल्हाळपुरा ता. बिलोली नांदेड याचा अर्ज दि. ०३/०२/२०२६ यांनी अर्ज सादर केला आहे की मनपा/सिडको घर क्र. .... टाईप .... सेक्टर .... शेत सर्वे नं. ....
गट नं. १६३ प्लॉट/फ्लॅट (सदनिका) क्र. २९ एकुण क्षेत्रफळ १२०.११ चौ/मी आहे
ज्याचा महानगरपालिका मालमत्ता क्र. १०-२ .... पिन नं. .... मौजे ....
श्री/श्रीमती [illegible] .... यांचे नावे नोंद असलेली मालमत्ता अर्जदाराने खरेदीखत/विक्रीखत/सोसापटी कब्जे नं. डीड/ओनरशिप पध्दतीने विक्रीखत/भाडेपट्टाहस्तांतरण/सिडको/एकत्रे दस्त क्र. ८०९६/२०२१
दि. ०४/१२/२०२१ व सिडको प्रशासन भाडे पट्टा हस्तांतरण आदेश (T.T.O.)क्र. सिडको ट्रान्सफर ऑर्डर दस्त क्र.CIDCO/ADM/NND/ / दि. / / सातबारा पत्रक दि. .... अधारे प्राप्त झालेली आहे त्यांचे नांवाचे नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर अकारणी नोंद घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन पंधरा दिवसाचे आत या कार्यलयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा. अन्यथा वरील आवधी संपल्यानंतर संदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नांवाने मालमत्ता कर आकारणी नोंदविहित सदरील नावाची नोंद घेण्यात येईल

चर्तु :सिमा :- पुर्वेस : गट नं. १६४ आहे
पश्चिमेस : ९.०० मी रूंद रोड आहे
दक्षिण : प्लॉट नं. ३० आहे
उत्तरेस : प्लॉट नं. २८ आहे

-स्वा-
क्षेत्रीय अधिकारी,
क्षेत्रिय कार्यालय क्र.६(सिडको),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.

**Change In Name**

My old Name is **SHEKH YASMIN ABDUL LATIF** which now I am Changing as New Name **YASMIN BEGUM SHAIKH SULEMAN** Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same,

Sign by : YASMIN BEGUM SHAIKH SULEMAN. Address : H NO 1-13-35 GALLI NO 2 PEER BURHAN NAGAR, NANDED 431605 Mob 9673408408

**Change In Name**

My Old Name is **RUPANI SHENAZ AMIRALI** which now I am changing as New Name **SHAHENAZ AMIN GANGWANI W/o. AMIN GANGWANI** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address :- A13, Silver Jubilee Appartment, Karimabad Housing Society, Khoja Colony, Nanded Mo.No. 9356137187

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. उत्तम गणपती भालेराव व भगवान गणपती भालेराव ,रा. नांदेड ता. जि.नांदेड यांनी मौ. ब्रम्हपुरी ता. जि.नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४२ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. ब्रम्हपुरी ता. जि.नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४२ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही,असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उपजिल्हाधिकारी (सामान्य)
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

**जाहीर प्रगटन**

माझे पक्षकार **पुंडलीक रामजी कसबे वय 48 वर्षे धंदा व्यापार रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नांदेड ता. जि नांदेड** यांनी दिलेल्या माहिती आणि अधिकारावरून सर्व जनतेस आणि संबंधीतांना सदरील जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की,

**माझ्या पक्षकाराने दिपक विजय सावते** रा. राजेशनगर नांदेड ता जि नांदेड यांच्या मालकी ताब्यातील मौजे तरोडा बु **नांदेड , ता जि नांदेड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील शेत गट नंबर 234 पैकी ज्योतीबानगर मधील एक प्लॉट ज्याचा प्लॉट नंबर 21 आहे ज्याची लांबी पुर्व पश्चिम 55 फुट आहे व रुंदी दक्षिण उत्तर 44 फुट आहे ज्याचे एकूण क्षेत्रफळ 2420 चौ फुट पैकी पुर्व पश्चिम 27.5 व रुंदी दक्षिण उत्तर 44 फुट एकूण क्षेत्रफळ 1210 चौ फुट असून ज्याची चतु:सिमा**

पुर्वेस - गट नंबर 234 मधील घर आहे
पश्चिमेस - प्लॉट नंबर 21 चा उर्वरीत भाग आहे
दक्षिणेस - घर आहे
उत्तरेस - 6.00 मीटर रुंद रोड आहे

सदर चतु:सिमेच्या आतील वर्णनाचा प्लॉट आंतरीक आणि बाहय हक्कासह **पुंडलीक रामजी कसबे** यानी खरेदी करण्याचा करारनामा केला असून बयाना पोटी काही रक्कम ही देण्यात आली आहे

सदरील व्यवहाराबाबत जर कोणाला काही आक्षेप, उजर, हक्क, विरोध असेल तर त्यांनी आपले लेखी म्हणजे जाहीर प्रगटन प्रकाशित झालेल्या तारखेपासून सात दिवसाचे आत कळवावेत. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा कसलाही विचार न करता माझे पक्षकार सदरील प्लॉटची रजिस्ट्री करून घेऊन कायदेशीर मालक होतील. मुदतबाह्य आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक : ०१/०४/२०२६.

मार्फत
Adv.Rajratan G.Shitale
B.A., LL.B., LL.M.
Reg.No.MAH/3217/2021
Dist.& Sessions Court,Nanded
Mob.9730414592
ॲड. आर. जी. शितळे
जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड
मो : 9730414592

जाहीर प्रगटन देणार
पुंडलीक रामजी कसबे
रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नांदेड
मो. 9860910790

**जाहीर प्रगटन**

मौजे तरोडा (खु.) ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. ९५ मधील शिवराय पार्क शिवराय नगर मधील प्लॉट नं. १/८ साईज ३० बाय ६० ज्याचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे १८०० चौ.फुटाचा प्लॉट निझार निरूद्दीन लालाणी यांच्याकडून सौ. वैशाली अनिल उबाळे रा. सिद्धार्थ नगर, तरोडा (बु.) नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. १/७, पश्चिमेस - २० फुटाचा रूंद रोड, दक्षिणेस - गट क्र. १९ चा भाग व उत्तरेस - ३० फुटाचा रोड.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे हस्तांतरण राजू दत्ता ढेपाळे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**सौ. वैशाली अनिल उबाळे**
**रा. सिद्धार्थ नगर, तरोडा (बु.) नांदेड**
**मो.नं. ९५८८६११४४२, ९४२२१८८०८५**

**Change In Name**

My Old Name is **Antariksha Rameshrao Ladane** which now I am changing as New Name **Antariksh Rameshrao Ladane.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Sign By : **Antariksh Rameshrao Ladane**
Address :- At.Po. Kekarjawala Tq. Manwat Dist. Parbhani Mo.No. 9511246015

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## इस्लामपुरात पाच लाखांचा गुटखा जप्त

### आयजी उमाप यांच्या पथकाची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** –दोन दिवसांपूर्वीच लातूर येथे गुटखा विरोधी कारवाई केल्यानंतर पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाने नांदेडमध्येही कारवाई करून शहराच्या इस्लामपुरा भागातून पाच लाख रुपयांचा अवैध गुटखा जप्त केला आहे.

१६ मार्चपासून पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थाविरुद्ध व्यापक मोहीम उघडली आहे. सदर मोहिमेच्या अनुषंगाने, विशेष पथकास पोलीस ठाणे इतवारा भागात एका पत्र्याच्या शेडमध्ये गुटखा साठवणूक केला असल्याची माहिती मिळाली होती. प्राप्त माहितीनुसार मंगळवार, दिनांक ३१ मार्च रोजी इस्लामपुरा भागात असणाऱ्या शर्मा यांचे मळ्यातील शेडमध्ये साठवून ठेवलेला ५ लाख ३ हजार ७४० रुपयांचा गुटखा पथकाने जप्त केला आहे. यावेळी पोलिसांनी आरोपी मोहम्मद शोएब मोहम्मद अकबर रा. मदिना नगर, देगलूर नाका नांदेड, शेख अमीर रा. हिमायतनगर नांदेड, शेख अजिम परभणीवाला रा. परभणी व बबलू शेख अजिमोद्दीन अब्दुल हमीद मुदखेडवाला, रा. मदिना नगर, मुदखेड यांच्याविरुद्ध इतवारा पोलीस ठाणे येथे गुरनं ९३/२०२६ कलम १२३, २७४, २७५, ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर प्रकरणाचा तपास पोलीस ठाणे इतवारा येथील पोउपनि प्रवीण आगलावे हे करीत आहेत.

यातील आरोपी क्रमांक एक मोहम्मद शोएब मोहम्मद अकबर रा. मदिना नगर, देगलूर नाका याच्याकडे सदरचा माल मिळाला आहे. या संदर्भाने माहिती घेतली असता आरोपी क्रमांक दोन शेख अमीर रा. हिमायतनगर, शेख अजिम परभणीवाला रा. परभणी आणि बबलू शेख अजिमोद्दीन अब्दुल हमीद मुदखेडवाला रा. मुदखेड हे गुटखा व्यवसायात संघटितपणे कार्यरत असून, ते शेजारील राज्यांतून मोठ्या प्रमाणात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची खरेदी करतात व सदर मालाची ठराविक ठिकाणी साठवणूक करून गरजेप्रमाणे नांदेड व परभणी जिल्ह्यातील किरकोळ व्यापाऱ्यांना त्याचा पुरवठा करतात, असे निदर्शनास आले आहे.

प्राथमिक तपासात निष्पन्न झालेल्या माहितीमुळे गुटखा खरेदी, वाहतूक, साठवणूक व वितरणासाठी आरोपींनी आणखी लोकांची मदत घेऊन एक व्यापक जाळे उभे केले आहे.

## बनावट कागदपत्र प्रकरणी गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– तालुक्यातील बाचेनगाव येथे ३० मार्च रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास ग्रामसेवक पदाच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक केल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी दत्ता चंदर पोटफोडे यांनी महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतमार्फत केलेल्या बांधकाम कामगारास मागील वर्षभरातील जास्त दिवस काम केल्याचे बनावट प्रमाणपत्र तयार करून ग्रामपंचायत कार्यालय करखेली तसेच ग्रामसेवक पदासाठी बनावट शिफारसपत्र व खोटी सही तयार केली. या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी लोकांकडून तब्बल १८ हजार रुपये घेतल्याची तक्रार दाखल झाली आहे.

तक्रारदार करखेली येथील ग्रामसेवक प्रकाश बाबाराव पवार (वय ५१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धर्माबाद पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस अंमलदार लोणेकर करत आहेत.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी घेतली भेट



**नांदेड (प्रतिनिधी)**– उपमुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांची नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी बुधवारी भेट घेतली. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्त्वाखाली ही भेट झाली आहे.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसची संपूर्ण धुरा उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर आली आहे. उपमुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांची नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली आहे.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, दक्षिणचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, नांदेड शहर जिल्हाध्यक्ष माधव पावडे, लोह्याचे नगराध्यक्ष शरद पवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान कार्यशाळा उत्साहात संपन्न

### मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांची उपस्थिती




**अर्धापूर (प्रतिनिधी)** – भाजपच्या वतीने संपूर्ण राज्यभर राबवले जाणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानामुळे भाजप संघटनात्मक बळकटीसाठी एक प्रभावी आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथे आयोजित प्रशिक्षण सत्र उत्साहात संपन्न झाले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाजप प्रदेशचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन, सोशल मीडियाचे प्रदेश संयोजक प्रकाश गाडे, जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना प्रदेश प्रवक्ते नवनाथ बन म्हणाले की, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या 'अंत्योदय' व 'एकात्म मानववाद' या विचारसरणीवर आधारित हे अभियान कार्यकर्त्यांना केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिक दायित्वांची जाणीव करून देणारे ठरत असल्याचे उपस्थितांनी सांगितले. तसेच पक्षाच्या धोरणांची सखोल माहिती, प्रभावी संवादशैली आणि तळागाळातील कामाची दिशा याबाबत मार्गदर्शन केले. हे प्रशिक्षण अभियान म्हणजे संघटनाची ऊर्जा अधिक बळकट करणारा पाया असून, कार्यकर्त्यांच्या माध्यमातून पक्षाची विचारधारा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याचे हे प्रभावी साधन आहे. या यशस्वी आयोजनामुळे संघटन अधिक सक्षम, सजग आणि जनतेच्या विश्वासास पात्र बनत आहे हीच या अभियानाची खरी ताकद आहे, असे वक्तव्य बन यांनी यावेळी केले.

यावेळी ज्येष्ठ नेते धर्मराज देशमुख, नांदेड कृऊबाचे सभापती संजय देशमुख लहानकर, माजी सभापती किशोर स्वामी, भाजप तालुकाध्यक्ष बालाजीराव गव्हाणे, नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, गटनेते बाबुराव लंगडे, आनंदराव भंडारे, शहराध्यक्ष योगेश हाळदे, माजी सरचिटणीस प्रवीण गायकवाड, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश चिटणीस रामराव भालेराव, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष विलास साबळे, कोंडीबा सूर्यवंशी, जठन मुळे, विठ्ठल काकडे, संतोष पवार, राजाराम पवार, पवन इंगोले, तुकाराम माटे, शंकर ढगे, सरपंच विजय भुस्से, सचिन कल्याणकर, कुश भांगे, महिला तालुकाध्यक्षा सौ.मंगल स्वामी, वर्षा बंडाळे, यशवंत राजेगोरे, बालाजी कदम, युवा नेते विराज देशमुख यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वीज चोरी पथकाची कारवाई, १३ जणांविरूद्ध गुन्हा दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)** – महावितरण कलंबर शाखेतील लाठ खुर्द येथे लघुदाब वाहिनीवर आकडे टाकून वीज चोरी करणाऱ्या १३ लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरण कलंबर शाखेतील लाठ खुर्द येथे महावितरणच्या लघुदाब वाहिनीवर आकडे टाकून वीज चोरी करीत होते. महावितरणच्या वीज चोरी पथकातील उपकार्यकारी अभियंता व्ही. एम. मठपती, डी. एम. मर्डे, टी. बी. तेलंगे, गौस डी. एम. मरडे, टी. बी. तेलंगे, गौस, पूजा सोनकांबळे, स्वाती खरे यांनी वीज चोरी पकडून केबल वायर जप्त केले व धडक कारवाई केली.

या प्रकरणी लाठी खुर्द येथील १३ लोकांवर भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ नुसार लोहा पोलिसांत वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वीज चोरी करणाऱ्यांमध्ये वसंत अवधूत घोरबंड, धोंडीबा संभाजी जाधव, राजू भाऊसाहेब जाधव, श्रीराम धोंडीबा गायकवाड, तारामती दिगंबर बाबळे, माधव रावण घोरबांड, तिरुपती विश्वंभर इंगोले, संग्राम संभाजी बाबळे, पांडुरंग ईश्वर बाबळे, चंद्रकांत आनंदा बाबळे, सचिन मारुती पुयड, संतोष लालू मोरे, संजय संभाजी जाधव यांचा समावेश आहे.

वीज चोरी करणाऱ्या सर्वांना एक लाख २८ हजारांच्या दंडाची नोटीस देण्यात आली आहे. यामुळे वीज चोरांमधे दहशत निर्माण झाली आहे.

## विप्र फाउंडेशनच्या प्रदेशाध्यक्षपदी गंगाबिशन कांकर यांची निवड



**नांदेड़ (प्रतिनिधी)** – विप्र फाउंडेशनच्या प्रदेशाध्यक्ष (जोन-१२ए) पदी गंगाबिशन श्रीकिशन कांकर यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे.

गंगाबिशन कांकर हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून त्यांनी विविध संघटनांमधून उल्लेखनीय कार्य केले आहे. मारवाडी युवा मंच, मारवाडी संमेलन, लायन्स क्लब तसेच राजस्थानी विप्र समाज नांदेड़ येथे सचिव म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळत समाजकार्याची भक्कम परंपरा निर्माण केली आहे. एक कर्मठ व समर्पित कार्यकर्ता म्हणून त्यांची समाजात ओळख आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण व प्रभावी कार्याची दखल घेत राजस्थानातील पुष्कर येथे आयोजित विप्र फाउंडेशनच्या राष्ट्रीय अधिवेशनात त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)** –कंधार तालुक्यातील सावळेश्वर येथे एका शेतकऱ्याने सततच्या नापिकीला व बँकेच्या कर्जाला कंटाळून विहिरीमधील पाण्यात उडी मारून आत्महत्या केली. ही घटना ३१ मार्च रोजी सकाळी दहाच्या सुमारास घडली.

सावळेश्वर येथील शेतकरी बळीराम उर्फ बळवंत जळबा कदम (वय ४३) यांच्या शेतात मागील काही वर्षापासून सततची नापिकी होत होती. त्यामुळे ते कर्जबाजारी झाले होते. शेतातील नापिकेमुळे बँकेच्या कर्जाचा बोजा वाढत गेला. यातून कर्ज कसे फेडावे या विवंचनेतून त्याने स्वतःच्या शेतातील विहिरीमध्ये पाण्यात उडी मारून आत्महत्या केली. या प्रकरणाची माहिती संतोष जळबा कदम यांनी उस्माननगर पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक सूर्यवंशी करत आहेत.

## विनापरवाना गुटखाप्रकरणी गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका आरोपीकडून पोलिसांनी विनापरवाना बेकायदेशीररित्या गुटखा बाळगणाऱ्या सांगवीच्या गोपाळनगर येथील एकाला अटक करून त्याच्याकडून साडेचार हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई चैतन्यनगर शिवमंदिर चौकात पोलीस उपनिरीक्षक सचिन शिंदे यांनी केली.

शहराच्या विमानतळ सांगवी परिसरातील गोपाळनगर येथे राहणारा सतीश प्रल्हाद भारती (वय ३२) याने आपल्या स्वार्थासाठी महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला विविध कंपनीचा गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू असा चार हजार सहाशे दहा रुपयांचा विनापरवाना बेकायदेशीररित्या आपल्या ताब्यात घेऊन काळ्या बाजारात विक्री करण्यासाठी जात होता. विमानतळ ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन शिंदे यांनी आरोपी सतीश भारती याला चैत्यनगर शिवमंदिर चौकात पकडले. त्याच्याकडून चार हजार सहाशे दहा रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. फौजदार सचिन शिंदे यांच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात सतीश भारतीविरुद्ध अवैध गुटखा बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर तिकडे इस्लापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतही मलकजाम तांडा येथे इस्लापूर पोलिसांनी कारवाई करून दुर्गादास गोविंद राठोड याला अटक केली. त्याच्याकडून विविध कंपनीचा गुटखा, पानमसाला, सुगंधी तंबाखू असा अकरा हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई ३१ मार्च रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास मलकजाम तांडा येथे केली. या प्रकरणी पोलीस अंमलदार ओमप्रकाश दिंडेवार यांच्या फिर्यादीवरून इस्लापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बापुराव पांपटवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –उदयनगर येथील प्रतिष्ठित नागरिक बापुराव विठ्ठलराव पांपटवार यांचे दि. ३१ मार्च २०२६ रोजी दुपारी ४-३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, नगरसेवक संजय, धनंजय व विजय अशी ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बापुराव पांपटवार यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. १ एप्रिल रोजी सकाळी शांतीधाम गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## डॉ. आंबेडकर जयंती जातविरहित आणि पारंपरिक पद्धतीने साजरी करणार

### जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी गिरीश जाधव तर सचिवपदी बालाजी इबितदार



**नांदेड (प्रतिनिधी)** –राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी कुणबी मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष गिरीश जाधव तर सचिवपदी उद्योजक बालाजी इबितदार यांची निवड करण्यात आली आहे. महापुरूषांना जातीच्या चौकटी बाहेर काढून त्यांची जयंती साजरी केली जावी, हा हेतू असून दि.१४ एप्रिल रोजी विविध जातीमधील मान्यवर यात सहभाग घेणार आहेत. पारंपरिक व अनोख्या पध्दतीने सकाळी ७ ते १२ या वेळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मिरवणूक काढण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजक तथा फुले-शाहू-आंबेडकर मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष प्रवीण खंदारे यांनी दिली.

अध्यक्ष इंजि. प्रवीण खंदारे यांच्या संकल्पनेतून महापुरुषांची जयंती आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. पत्रकार परिषदेत माहिती देताना प्रवीण खंदारे यांनी सांगितले की, राज कॉर्नर येथून सकाळी सात वाजता जयंती महोत्सवाला प्रारंभ होणार असून, अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत जयंती मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. विशेष म्हणजे या मिरवणुकीमध्ये डीजे असणार नाही. सुरूवातीला मशाल रॅली, हलगी पथक, मुलींचे लेझीम पथक, दोन उंट, २० घोडे, आदिवासी ढेमसा नृत्य, जीवंत देखाव्यांचा रथ, बैलगाडी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भव्य प्रतिमा, मुलींचे ढोलपथक आणि मोठ्या वाहनांमध्ये सामाजिक देखावे असणार आहेत. सकाळी ७ ते दुपारी १२ वाजेपर्यंत या जयंतीची मिरवणूक संपन्न होणार आहे.

राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव २०२६ च्या अध्यक्षपदी कुणबी मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष गिरीश जाधव, उपाध्यक्ष डिग्निटी हॉस्पीटलचे संचालक सुयश शिंदे, सचिवपदी उद्योजक बालाजी इबितदार, सहसचिव जलसंपदाचे गजानन मेडके, कोषाध्यक्ष महेंद्र देमगुंडे, सदस्य म्हणून कमलाकर बिरादार, प्रवीणकुमार देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.

या जयंती महोत्सवात डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, वकील यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग असणार आहे. नांदेडकरांनी यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजक प्रा. डॉ. शुद्धोधन एडके यांनी केले आहे.

## खासगी क्लासेसच्या विरोधात शिवसेनेचे आंदोलन



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरात खासगी कोचिंग क्लासेस मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. क्लासेसमध्ये नियमांचे सर्रास उलंघन, अव्वाच्या सव्वा फिस घेऊन पालक व विद्यार्थ्यांची दिशाभूल व लूट होत असल्याची तक्रारी करीत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नांदेड उत्तरचे तालुकाप्रमुख सुनिल पाटील कदम यांच्या नेतृत्वात बुधवारी दुपारी १२.३० वाजता शिवाजीनगर स्टेडियम परिसरातील कोनाळे कोचिंग क्लासेससमोर आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान शिवसेना महानगरप्रमुख मनोज यादव, नांदेड दक्षिणचे शहरप्रमुख अर्जुन ठाकूर, युवासेनेचे युवा जिल्हाधिकारी ॲड. अक्षय वटमवार, तालुका संघटक नवनाथ पाटील जोगदंड, नितीन सरोदे, शहर संघटक मनोज काकडे, उपतालुका प्रमुख पुरभाजी जाधव, कुंडलीक पाटील शिंदे, गणेश पाटील शिंदे, युवासेना युवा उपजिल्हाधिकारी परवेज शेख, कुंडलिक पाटील मरळकर, शाखाप्रमुख ख्वाजाभाई, मारोती पाटील कदम, श्रीकांत पाटील कदम, राम पाटील कदम, शिवा पाटील कदम, कैलास पाटील जोगदंड, पवन पाटील कदम, प्रभाकर वानेगावकर, सोपान बोकारे, लालचंद यादव, माधवराव कल्याणकर, ओमकार पाटील कदम, भारत पांडे, तुकाराम केळकर, संदीप कासलीवाल यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक, पालक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. जय भवानी जय शिवाजी, शिवसेना अंगार है, बंद करा बंद करा शिक्षणाचे बाजारीकरण बंद करा, कोनाळे हाय हाय, कोनाळेचे करायचे काय खाली मुंडके वर पाय अशा घोषणांनी सर्व परिसर दणाणून गेला.

नांदेड शहरात अनधिकृत कोचिंग, बेकायदेशिर प्रवेश, आर्थिक लूटमार या सर्व बाबी शहरातील अनेक कोचिंग क्लासेसमध्ये होत आहे. अनेक कोचिंग क्लासेसमध्ये मोठ्या प्रमाणात फिस घेतली जात आहे, अनेक क्लासेसमध्ये मूलभूत सुविधा शून्य असून, क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी आहेत. पार्किंगची व्यवस्था नाही, सर्रासपणे विद्यार्थी आपल्या गाड्या रस्त्यावर लावतात आणि सकाळी आणि सायंकाळी ट्राफिक जाममुळे रस्त्यावर चालणे देखील जमत नाही, गोरगरीब, शेतकरी पालकांची अव्वाच्या सव्वा फिस आकारून मोठ्या प्रमाणात लूट होत आहे, शासन निर्णयाप्रमाणे वर्गात ४० ते ५० विद्यार्थी बसवण्याचा जीआर असताना खाजगी कोचिंग क्लासेसचे व्यवस्थापन एका वर्गात २०० ते ३०० विद्यार्थी बसवतात, ना पार्विंगची व्यवस्था, ना अपत्ती व्यवस्थापनाचे नियम पाळले जातात. इतक्या मोठ्याप्रमाणात प्रवेश दिले जातात पण निकालाचा टक्का कायम घसलेला असतो, शहरात विविध ठिकाणी होर्डिंगस लावून, सोशल मिडीयावर आमच्या क्लासेसचा निकाल १०० टक्के, आमचेच विद्यार्थी निकालात टॉपर असल्याच्या जाहिराती करून गोरगरीब, शेतकरी, पालकांची व विद्यार्थ्यांची दिशाभुल केली तर जातेच पण फिस देखील मोठ्या प्रमाणात घेतली जात आहे. खाजगी क्लासेसचा वाढता सुळसुळाट, शिक्षण का खाजगी व्यवसाय, शिक्षणाच्या नावाखाली पालकांची आर्थिक लूट बंद करा, असे सुनिल पाटील कदम यांनी यावेळी सांगितले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com